# पद भाग क्र.२

७ :– चेतावणी को अंग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांड्क यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समझन्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

| अ.नं. | पद | पेज नं. |
|---|---|---|

## पद भाग क्र.२

### ७ :– चेतावणी को अंग


| | | |
|---|---|---|
| १ | बंदा अंतकाळ पिछ्तासी ३५ | १ |
| २ | बंदा गाय गाय हर गाय रे ३६ | १ |
| ३ | बंदा जाग जाग नर जाग रे ३९ | २ |
| ४ | बांदा काहा कियो नर होई ४१ | ३ |
| ५ | बंदा नाँव सताबी लिजे ४८ | ५ |
| ६ | बंदा सरण सबळ की गेहेरे ६४ | ६ |
| ७ | चाँवड मान्या जोय ९३ | ६ |
| ८ | ध्रिग लाणत मन आप कूं हो ११२ | ७ |
| ९ | अे चेतावण जम लोक का ११७ | ८ |
| १० | अेका अेकी रे तु चल जासी १२१ | ९ |
| ११ | ग्यान सुणे सुण चेत ज्यो रे १३६ | ११ |
| १२ | हंसा छाडोनी जुग को नेह १३९ | १२ |
| १३ | हेला दे दे संत पुकारे १५४ | १३ |
| १४ | जब जम आण नगर कुं घेरे १५९ | १४ |
| १५ | कपटी राम न पावे हो १९२ | १५ |
| १६ | मै तुज बूझुँ रे प्राणिया २१६ | १७ |
| १७ | मन रे गाफल चेत संवेरो २२१ | १८ |
| १८ | मन रे सिमर सिमर हल सांई २२५ | १८ |
| १९ | मन रे मत फुले मुढ गिवांरा २२८ | १९ |
| २० | मात पिता सुत बंधू तेरा २३१ | २० |

| | | |
|---|---|---|
| २१ | नही रे असो लगन दूजो कोय २४५ | २२ |
| २२ | पांडे से सब मधम कहावे २७१ | २३ |
| २३ | प्राणी क्यु हर बिसऱ्यो रे २८५ | २४ |
| २४ | प्राणीयां काय तूं सुतो रे २८८ | २६ |
| २५ | प्राणियां रे समझ सिंमरो राम २९० | २६ |
| २६ | सब भ्रम छाड दईजे रे ३०४ | २८ |
| २७ | साहेब जी सें डरीये मन रे ३२३ | २९ |
| २८ | समझो हो नर समझ नार ३२९ | ३१ |
| २९ | संतो भजलो केवल रामा ३३२ | ३२ |
| ३० | संतो काळ सिर भारी हे ३६० | ३३ |
| ३१ | सुण लिज्यो लो सुण लिज्यो लो ३८४ | ३४ |
| ३२ | सुणज्यो नर सब आय केरे ३८५ | ३५ |
| ३३ | सुणो सब या बातां किम पावे ३९३ | ३६ |
| ३४ | ताको भुल आण नही ध्यावे ३९५ | ३८ |

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

३५
।। पदराग सोरठ ।।

**बंदा अंतकाळ पिछतासी**

**भजन बिना तेरी चुप चतुराई ।। सबी धूळ में जासी ।।टेर।।**

अरे बंदा,अरे प्राण्या तू कितीही हुशार असलास,शहाणा असलास व तु ही हुशारी रामनामाचे भजन करण्यात नाही लावली तर ही तुझी हुशारी धुळात मिळुन जाईल. तुझा अंतकाळ येईल तेव्हा तुला जालीम यम धरतील तेव्हा तु ही हुशारी यमापासुन सोडविणाऱ्या रामनामाच्या भजनात लावली नाही याचा पश्चाताप करशील. ।।टेर।।

**जंवरो जोर जोरावर शिर पे ।। जीव कूं बांध गुड़ावे ।।**

**कर मुख आगे लेर चलेलो ।। तब आड़ो कुण आवे ।।१।।**

अरे बंदा,अरे प्राण्या तुझ्या शिरावर हा जुलमी यम पुर्ण जोर लावुन बसलेला आहे.हा तुला तु त्याच्यापासुन सुटु शकेल असे काही उपाय नाही करता येणार असे जखड्बंध बांधेल व तुझ्या शरीराला गलंड्डुन तुझा जीव तुझ्या शरीरातुन काढ्ढुन घेईल व जसा गरुड पक्षी मुखामध्ये नागाला धरुन गगनात तोड्डुन तोड्डुन खाण्याकरिता घेऊन जातो त्या प्रमाणे हा यम तुला मुखात धरुन यमलोकात तोड्डुन तोड्डुन खाण्याकरिता घेऊन जाईल तेव्हा तुला यमापासुन रक्षण करण्याकरिता यमाच्या आड्वा कोण येईल याचा विचार कर. ।।१।।

**रे नर चेत अचेत अग्यानी ।। याहाँ कोई नहि तेरा ।।**

**निस बासर शिर करम खिवेरे ।। जम तक तक दे फेरा ।।२।।**

अरे मनुष्या चेत,हुशार हो,अचेतन राहु नको,अज्ञानी बनु नको येथे तुला यमापासुन सोडविणारा तुझा कोणी नाही आहे.रात्रंदिवस तुझ्या मस्तकावर तुझे केलेले काळ कर्म तुला काळाच्या मुखात टाकण्याकरिता जोर लावुन बसले आहेत.यम तुला नेण्याकरिता योग्य मोका पहात तुझ्या शिरावर फेरे मारुन राहिला आहे.।।२।।

**तीन लोक में जीव रळवळे ।। भवताँ बोहो जुग बीता ।।**

**के सुखराम सुणो नर नारी ।। भगत करे सो जीता ।।३।।**

हा जीव आपल्या काळ कर्माप्रमाणे तीन लोकांत गोते खाऊन राहिला आहे.अशाप्रकारे ह्या जीवाचे स्वर्ग,मृत्यु,पाताळ ह्या तिन्ही लोकांत भटकता भटकता भ्रमता भ्रमता अनेक युग व्यतीत होऊन गेले आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की, सर्वही स्त्री–पुरुष ऐका जो रामजीची भक्ती करेल तोच अशा जालीम यमाशी जिंकेल व अन्य सर्व यमाच्या मुखात दुःख भोगीत पड्तील. ।।३।।

३६
।। पदराग सोरठ ।।

**बंदा गाय गाय हर गाय रे**

**आन उपाय सकळ हे झूठी ।। सो सब ही छिटकाय रे ।।टेर।।**

बंदा अरे मन,अरे जीव तुला अमर व्हायचे आहे तर सतस्वरुप रामाचे भजन कर. काळाचे दु:ख मिटविण्यासाठी रामाची भक्ती सोडून अन्य सर्व भक्त्या व उपाय खोटे आहे.अन्य सर्व भक्त्या व उपायांनी जीव अमर होत नाही.त्याचे काळाचे दु:ख मिटत नाही या करीता अन्य सर्व भक्त्या व उपाय सोडून दे.।।टेर।।

**सो शिवऱ्यां सो अमर हुवे रे ।। काळ जम डर माने ।।**
**सुर नर मुनि शंकर बंदे तो ।। बिसन भली बिध जाणे ।।१।।**

अरे बंदा ज्यांनी ज्यांनी सतस्वरुप हरचे स्मरण केले आहे ते सर्व अमर झाले आहे. जन्म मरणापासून मुक्त झाले.अशा हरचे स्मरण करणाऱ्यांना पारब्रम्ह काळ व यमराज ही भय मानतो व अशा संतांना धुजतात.स्वर्गादिकाचे सर्व देवता,पृथ्वी लोकाचे मनुष्य, पाताळाचे सर्व लोक,ऋषी,मुनी,शंकर,ब्रम्हा,विष्णू,शक्ती हे सर्व रामभजन करणारे संत काळापासून मुक्त होवून गेले म्हणजे अमर देशात पोहचून अमर होवून गेले हे खूप चांगल्या तऱ्हेने जाणतात म्हणून हे सर्व या संतांची वंदना करतात. ।।१।।

**काटे करम आगला सारा ।। फेर करम नहि लागे ।।**
**भव सब तोड़ मिले साहिब में ।। साँसो सब ही भागे ।।२।।**

असे रामभजन करणाऱ्या संतांचे आधीपासून आतापर्यंत झालेले सर्व संचित कर्म कटून जातात व नवीन क्रियेमान कर्म एकही लागत नाही.हे रामभजन करणारे संत भवबंधन तोडून साहेबात मिळून जातात.अशा रामभजन करणाऱ्या संतांची काळाच्या दु:खांची सर्व चिंता पळून जाते.।।२।।

**बार बार मोसर नहि आवे ।। ओ मिनषा तन भाई ।।**
**के सुखराम भजो साहिब कूं ।। जिण आ मांड उपाई ।।३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी,स्त्री,पुरुषांना सांगून राहिले आहेत की,हे मनुष्य तन ४३,२०,००० वर्षांपर्यंत चौऱ्यांशी लक्ष योनीचे दु:ख भोगल्यानंतर मुश्किलीने एक वेळा मिळतो म्हणून ज्या साहेबाने ही सृष्टी बनविली,तुला बनवले अशा साहेबाचे भजन कर व अमर होवून जा. ।।३।।

३९

।। पदराग सोरठ ।।

**बंदा जाग जाग नर जाग रे**
**सोयर काय बिगु चे मूरख ।। ऊठ भजन सूं लाग रे ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बंदा म्हणजे प्राण्यास म्हणतात की अरे प्राण्या मोह ममतेत झोपु नकोस मोह मायेतुन जाग,हुशार हो,चेतन हो.मोह ममतेत झोपुन तु तुझे भवसागरातुन तिरण्याचे कार्य बिघडु देऊ नकोस.तु उठ व राम नामाचे भजन कर.।।टेर।।

**तो सिर गजब काळ की आई ।। सब कुळ देखत लूटे ।।**

।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

तीन लोक ओ राम बिना रे ।। कांहु जाय न छुटे ।।१।।

तुझ्या शिरावर काळरुपी लुटारुची धाड आली आहे तो काळ कुळ परिवाराच्या समोर तुला लुटेल म्हणजे तुझा जीव तुझ्या देहातुन काढुन नरकात घेऊन जाईल तु ह्या काळ लुटारु पासुन राम सोडुन तीन लोकांतील कोणत्याही देवाच्या प्रतापाने वाचु शकणार नाही.।।१।।

तेरी जोय फजीती व्हेला ।। अंत काळ के मांही ।।
पड़सी मार घणी गुर्जा की ।। कोय छुडावे नाही ।।२।।

तुझी अंतकाळात फार फजीती होईल तुझ्या डोक्यावर यमदुत गुरुजाने मार देतील तेव्हा यमाच्या मारापासुन तुला कोण सोड्वेल?।।२।।

नंर्क कुंड दोजख दुख भारी ।। प्रळो कहयो न जावे ।।
ग्रभवास मे उंधो टेरे ।। झिणा दुख बोहो पावे ।।३।।

हंसावर नर्ककुंडात असह्य भारी दु:ख पड्तात हंस वारंवारं चौऱ्यांशी लक्ष योनीत प्रलयात पड्तो व प्रत्येक योनीत गर्भाचे दु:ख भोगतो गर्भात जीवाला उलटे लटकविल्या जाते असे मोठे मोठे दु:ख जीवाला भोगविले जातात जिवाला झीने दु:ख तर अमोजके भोगावे लागतात ते दाखविल्याही जात नाही. ।।३।।

चेते क्युं न अचेतन अंधा ।। क्युँ जीत्योडो हारे ।।
के सुखराम बाज तीतर ज्यूं ।। जम तोय पटक पछाडे. ।।४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज प्राण्याला म्हणतात अरे आंधळ्या तु हुशार हो तु हुशार का होत नाही?तुला मनुष्य देह मिळाला आहे हा मनुष्य देह मिळण्याचा मोठा डाव हातात आलेला आहे.तु आता यमाला जिंक मनुष्य देहाने रामराम रटुन यमाला मारता येते म्हणुन हा मनुष्य देहाचा हातात आलेला डाव हारु नकोस जसा बाज पक्षी तितर पक्ष्याला झपटुन धरतो व मरेपर्यंत आपटतो तसा यम तुला धरेल व तुला आपटुन आपटुन तुझ्या देहातुन प्राण काढेल.।।४।।

४१
।। पदराग सोरठ ।।

बंदा काहा कियो नर होई
सिरजण हार स्याम तूं बिसऱ्यो ।। चाल्यो जनम बिगोई ।।टेर।।

अरे बंदा,तुला नर तन मिळूनही तु काय केले?तुला हे मनुष्य शरीर काळाला मारुन सिरजन हार श्याम प्राप्त करण्यासाठी सिरजनहार श्याम ने दिले होते परंतु तू ही सिरजनहार श्याम प्रगट करुन काळाला मारण्याची रीत न करता माया कर्म करुन काळाची दु:ख देण्याच्या रीतीला मजबूत केले आहे म्हणजे मिळालेला मनुष्य तन बिघड्वून जन्म गमवला आहे.।।टेर।।

नर नारी ओ जगत रिजायो ।। कर कर सेणप सिपती ।।

आन देव कूं निव निव पूजे ।। राम न शिव्र्यो बिपती ।।१।।

अरे बंदा,तू या मनुष्य शरीराला या संसाराच्या स्त्री–पुरुषांना ज्यांच्याने मोक्ष होत नही असे खोटे शहाणपण करुन करुन खुश करण्यात लावले तसेच रामजीला सोडून ८४ लक्ष योनीत टाकणारे अन्य देवतांना नमन करुन करुन पुजत राहिला,तू विपत्तीतून काढणाऱ्या रामजीला विपत्ती पडल्यावरही स्मरण केले नाही.खोटे शहाणपण(विस्तारीत) ज्या ज्या विधीने मोक्ष देणारे साहेब रिझत नाही व परीवार,समाज,गावाचे लोक, राज्याचे लोक जे मायेत पूर्ण रचमचलेले आहेत.असे मलमूत्रधारी स्त्री,पुरुष खुशी होतात,अशा शाऱ्या विध्या करणे म्हणजे मोक्षात न पोहचता ८४ लक्ष योनीत अटकून पडणे अशा शाऱ्या शाऱ्या विध्यांना खोटे शहाणपण म्हणतात. ।।१।।

जाग्यो रात करम के कारण ।। जूँझ्यो माया काजे ।।
स्वारथ कूं नर बुरी पलोटे ।। परमारथ सूं लाजे ।।२।।

रात्र रात्र विषयाच्या कर्माच्या कारणाने जागत राहिला,आई,वडिल,मुलगा,मुलगी, धन, राज्य असे सोबत न चालणाऱ्या खोट्या मायेसाठी रात्रंदिवस झुंजला परंतु सतसंगती करीता केव्हाही झुंजला नाही.मायेच्या स्वार्थासाठी अंतरमध्ये जमत नसलेली अशी कशीही वाईट गोष्ट असली तरीही निभवून घेतली व तू परमार्थ म्हणजे जीव काळापासून मुक्त होवू शकतो यात लाजत राहिला. ।।२।।

कीया अंध फंद बोहो तेरा ।। सीख्यो चुप चतुराई ।।
अेक न सीख्यो राम रहु को ।। जिण आ मांड उपाई ।।३।।

चौऱ्याऐंशी लक्ष योनीत पडण्याचे अंधाधुंदीचे म्हणजे कोणताही विचार न करता कैक निच फंद केले आणि खोट्या मायेच्या बारीकहून बारीक चतुराई शिकला परंतु एक राम रहू का म्हणजे ज्याने ही सृष्टी उत्पन्न केली व तुला उत्पन्न केले त्याला प्राप्त करण्याची विधी शिकली नाही. ।।३।।

हरजन ग्यान कोरडा मारे ।। तब उतर बोहोल्यावे ।।
के सुखराम भूत ज्युँ मनवो ।। डाळा पान बतावे ।।४।।

अशा रामजीला मिळवून देणारे हरजन म्हणजे रामजीचे जन तुझ्या अज्ञानपणामुळे काळाच्या मुखात जावून पडण्याच्या स्वभावावर काळातून निघण्याचे निर्भय देशाचे विज्ञान ज्ञानाचे चाबूक देतात तेव्हा तू अशा संतांना अनेक प्रकारचे ज्यात काही तथ्य नाही असे उत्तरावर उत्तर देतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात अरे मना, तू अशा हरीजनास भूतासारखे उत्तर देवू नको,भूताच्या देहाची समज इतकी हलकी राहते की त्याला झाडाचे बीज दिसत नाही त्याला झाडाच्या ड्हाळया आणि पानच दिसतात.या ड्हाळ्यांसोबत आणि पानांसोबत तो रात्रंदिवस खेळत राहतो म्हणून त्याचे

उत्तर ही ड्हाळ्या आणि पानांसारखेच राहतात.त्या झाडाला लागलेले झाडाचे फळ बीजापासून लागले हे दिसत नाही.त्याला हे फळ बीजापासून लागले हे दिसत नाही. त्याला हे फळ ड्हाळ्या,पाने असल्या कारणाने लागले असे वाटते.याच प्रकारे मनाला सतस्वरुपी मुक्ती देणारा सृष्टी बनविणारा बीजस्वरुपी सिरजनहार दिसत नाही.त्याला सतस्वरुपी मुक्ती देणारे ड्हाळ्यांसारखे ब्रम्हा,विष्णू,महादेव,अवतार व पानांसारखे दुर्गा, सितला,भेरु,भोपा,क्षेत्रपाळ,खंडोबा हेच दिसतात याकरीता मन सतस्वरुपाला न शोधता ब्रम्हा,विष्णू,महादेव,अवतार,दुर्गा,सितला,भेरु,भोपा,क्षेत्रपालची भक्ती करतो.।।४।।

४८

।। पदराग सोरठ ।।

**बंदा नाँव सताबी लीजे**

**जो कुछ हुस हुवे दिल भीतर ।। तो परमारथ कीजे ।।टेर।।**

अरे बंदा,अरे जीव,तू रामनाम विलंब न करता लवकर घे.अरे तुझ्या हृदयात काही हौस म्हणजे उल्हास आहे तर जीवाला रामनाम घेवून काळाच्या मुखातून काढण्याचा परमार्थ कर.।।टेर।।

**तो शिर काळ भँवे निस वासर ।। नित फेरा दे जावे ।।**

**कबुयक आण अचाणक जंवरो ।। काट काट ज्यो खावे ।।१।।**

अरे जीव,तुझ्या मस्तकावर रात्रंदिवस काळ घिरट्या घालून राहिला आहे.तुला झपटून खाण्यासाठी तुझ्या शिरावर नित्यप्रती फेऱ्या मारुन राहिला आहे.कधीही हा यम तुला न समजू देता अचानक ड्सून कापून खावून जाईल. ।।१।।

**ओसर जाय नीर ज्युँ सिलतां ।। पाछे धूळ रहे रे ।।**

**राम भजन बिन सब पिछतासी ।। साध सकळ सो कहेरे ।।२।।**

अरे बंदा,तुझे आयुष्य पावसाळ्यात दोन्ही कराडे भरलेली नदी जशी उन्हाळ्यात सुकून जाते व मागे फक्त धूळच धूळ राहते असे.तुझे महासुखात घेउन जाणारे श्वासांनी भरलेलं फुललेलं आयुष्य संपून जाईल व अंतीममध्ये चौऱ्यांशी लक्ष योनीत घेवून जाणारे धूळेसारखे काळरुपी कर्म मागे लागून जाईल.अरे,राम भजनाशिवाय सर्व जगाचे ज्ञानी,ध्यानी,नर,नारी पस्तावा करतात.असे सर्व साधू सांगत आले आहे व सांगून राहिले आहे.।।२।।

**हंस बटाऊं ओ जुग मेळो ।। सोदो समझ बसाई हे ।।**

**के सुखराम बूजकर बिणजे ।। मूळ हार मत जाई हे ।।३।।**

हा हंस संसाररुपी मेळ्यामध्ये म्हणजे यात्रेमध्ये आलेला वाटसरु आहे.जसे मेळ्यांमध्ये अनेक लोक येत जात राहतात व हलका भारी सौदा करतात याचप्रकारे हा वाटसरुपी हंस संसाररुपी मेळ्यामध्ये मोठा सौदा करण्याकरिता आला आहे.आता या मेळ्यामध्ये

समजून मोक्षरुपी मोठा सौदा विकत घेवून घे.या संसारात आधी मोक्षरुपी मोठे मोठे सौदे ज्या ज्या संतांनी केले त्यांना विचारुन विचारुन मोक्षाचा सौदा करुन घे व तुला मिळालेली श्वासारुपी पुंजी गमवून चौऱ्यांशी लक्ष योनीत जावू नको असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बंदाला सांगून राहिले.।।३।।

६४

।। पदराग सोरठ ।।

**बंदा सरण सबळ की गहेरे**

**निर्बळ सरण सकळ जम तोड़े ।। अेक पारब्रम्ह की रहे रे ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात अरे मना,अरे प्राणी तुला काळ कसाई पासून जिंकून देईल अश्या बलवानाची तू शरणा घे.ब्रम्हा,विष्णू,महादेव अश्या निर्बल देवांचा जर तु शरणा घेतला असेल तरी ही तुला काळ कसाई खाईल. ।।टेर।।

**अेसो जबर काळ कसाई ।। तीन लोक चुण खावे ।।**

**ब्रम्हा बिस्न महेसर सत्ती ।। सब सिर ताळ बजावे ।।१।।**

हा काळ जबर कसाई आहे.तो मृत्युलोक,पाताळलोक,स्वर्गलोक असे तीन लोकातील जीवांना शोधून शोधून खातो.तो(३ लोक १४ भुवनाचे)ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती या सर्व नाथांना आपल्या आज्ञेत ठेवतो व वेळ आल्यावर त्यांनाही गीळून टाकतो. ।।१।।

**ओऊँम सब्द अजपो कहीये ।। फेर भृगुटी को ध्यानी ।।**

**सुर नर जोगी सकळ जम खाय ।। खाया पीर मत ग्यानी ।।२।।**

काळाने खाउ नये म्हणून ओअम-अजप्पा शब्दाची साधना करुन भृगुटीत चढून बसता तर असे चढून बसलेले भृगुटीच्या ध्यानीला काळ कधी ना कधी खातो.त्याचप्रकारे देवता,मनुष्य,जोगी,पीर आणि मतज्ञानी या सर्वांना काळ खातो असा हा काळ कसाई आहे. ।।२।।

**जो जन सुणो काळ सूं जीतो ।। उलट चडे अकासा ।।**

**के सुखराम चाड मन पवना ।। करे आद घर बासा ।।३।।**

जो संत काळापेक्षा बलवान असलेल्या सतस्वरुप पारब्रम्हचा शरणा घेतो तोच संत काळाला जिंकतो आणि आपल्या घटात उलटून काळाच्या पलिकडे राहणाऱ्या सतस्वरुप गगणात चढतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.असा त्रिगुटीत पोहचलेला संत त्रिगुटीच्या घरी मनाला आणि दहावेद्वारात आणि सतस्वरुपी आद घरी निवास करतो फक्त अश्या संताला काळ खात नाही.।।३।।

९३

।। पदराग मंगल ।।

**चाँवड मान्या जोय**

चाँवड मान्या जोय ।। छीजे तन भागसी ।।
क्षेत्र पांळ कूं मान ।। क्रम बोहो लागसी ।।१।।

चांवड मातेची भक्ती करतो व त्याला निरअपराध प्राण्यांची बळी देतो त्याचे तन रोगीट होऊन क्षिण होऊन जाते किंवा कमी वयामध्ये सुटून जाते.हा जीव नरकात जाऊन पडतो.क्षेत्रपाळची भक्ती करुन त्याला बळी चढवितो त्याला नरकाचे कठीण कर्म झोंबतात व मेल्यानंतर नरकात पडतो. ।।१।।

अर पीरांसूं कर हेत ।। नरक मे जायगो ।।
मोगा को कर प्यार ।। धक्का बोहो खायगो ।।२।।

पिरांशी प्रेम करुन त्या प्रेमात जीवांची बळी देतो तो नरकात जाऊन पडतो,मोगाशी प्रेम करुन निरअपराधी प्राण्याची बळी चढवितो व काळाचे अनेक धक्के खातो. ।।२।।

भेरूं सितळा पूज ।। साहेब सूं दूर रे ।।
दुरगा को कर पाठ ।। करमा को पूर रे ।।३।।

भैरु,शितलाला पूजून बळी चढवितो त्याच्यापासून साहेब दूर होऊन जातो व यम वाईट तऱ्हेने नरकात टाकण्याकरीता घेरुन घेतो दुर्गेचा पाठ ठेवून जीवांचे प्राण देतो त्याच्या येथे नरकाच्या कर्मांचे पूर वाहतात. ।।३।।

पाबू की कर सेव ।। धका बोहो खावसी ।।
आन देव कूं पूज ।। नरक में जावसी ।।४।।

पाबुला बळी चढवून त्याची सेवा करतो तो काळाचे खूप धक्के खातो.आनदेवला पूजून आनदेवाच्या समोर प्राणी चढवितो व त्याची बळी देतो तो जीव नरकात जाऊन पडतो. ।।४।।

मामे देव कूं मान ।। ईसरी ध्यावसी ।।
के सुखदेव वे जीव ।। चोरासी जावसी ।।५।।

मामेदेव ईसरीला मानता करुन निरअपराधी प्राण्यांची बळी देतो तो जीव चौऱ्यांशी लक्षच्या कठीण दु:खात पडतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले. ।।५।।

११२

।। पदराग धमाल ।।

ध्रिग लाणत मन आप कूं हो
ध्रिग लाणत मन आप कूं हो ।। तुं हर तज सेवे आन ।।टेर।।

अरे मन,तुला धिक्कार आहे.तुला लाणत आहे.अरे तू हर रामजीला सोडून अन्य दुसऱ्या देवांची सेवा करतो आहे,तुला धिक्कार आहे.तुला लाणत आहे. ।।टेर।।

तन के बिच बिराजे सांई ।। तां की दिशा न जाय ।।
आठ पोहर चोसट घड़ियाँ ।। सो रहे भटक जुग मांय ।।१।।

अरे,या शरीरातच सांई(स्वामी)राहतो.त्या स्वामीच्या जवळ तर तू जात नाही आणि अष्टौप्रहर,रात्रं दिवस आणि चौसष्ट घडी संसारात वासनाच्या सुखात भटकत राहतो किंवा झोपलेला राहतो. ।।१।।

**आळ जंजाळ बोहोत बिध बोले ।। नाच रहयो दिन रात ।।**
**सरब उपाय अनेक कर हे ।। हरि दिसने कन बात ।।२।।**

तू बिना कामाचे म्हणजे व्यर्थ पुष्कळ तऱ्हेने बोलतो आणि त्यातच रात्रंदिवस रचून मचून राहतो.तू दुसरे तर अनेक प्रकारचे अनेक उपाय करतो.परंतु हरी कडील तर थोडीशीही गोष्ट करीत नाही आणि ऐकत ही नाही. ।।२।।

**पाछे कूं नर सोचत हे हो ।। आगम सोच न कोय ।।**
**नासत सुं नित खसत हे हो ।। आ सत गहे न कोय ।।३।।**

मी मरुन गेलो तर माझ्या नंतर माझ्या मागे माझ्या कुंटुब परीवाराचे कसे होईल याची चिंता करतो परंतू मी मरुन गेल्यावर माझ्या जीवाचे पुढे कसे होईल याची काही ही चिंता करीत नाही.नाशवान मुर्त्याची व अवतारांची पूजा नित्य मेहनत करुन करतो आणि जो सत आहे ज्याचा कधीही तिन्ही काळात नाश होत नाही.अशा रामजीला जरासे ही धारण करीत नाही. ।।३।।

**जिन रटियाँ सुख अणंत लहीजे ।। जाय अनन्त फंद खूल ।।**
**कहे सुखदेव मे कहत पुकारी ।। ताय निमक मत भूल ।।४।।**

रामनामाचे रटन केल्याने,अनंत सुख मिळतात आणि अनंत दुःखाचे फंद सुटून जातात. असे हे राम नाम आहे,त्याला क्षणभरासाठी ही विसरु नका.असे आदि सतगुरु सुखारामजी महाराज आवाज देऊन सांगत आहे. ।।४।।

११७

।। पदराग जोगारंभी ।।

**अे चेतावण जम लोक का**

**अे चेतावण जम लोक का ।। कोई नर ध्यावे ।।**
**मार पडे सिर ऊपरे ।। नरकी दुख पावे ।।टेर।।**

स्त्री पुरुषांच्या नीच स्वभावानुसार स्त्री पुरुषांच्या शिरावर यमाचा मार पडतो.तसेच स्त्री पुरुष नरकीय दुःख भोगता ज्या ज्या स्वभावाने यमचा मार पडतो,नरकीय दुःख पडते त्या स्वभावाचे जीव संत ज्ञानाने चेतून जातील व साहेबाचे ध्यान करतील ते सर्व जीव साहेबाचे सुख प्राप्त करतील. ।।टेर।।

**निंद्यां करे सो नीच हे ।। कड़वी कह कोड़ी ।।**
**दगो करे सो जम रे ।। लपटी सुण ओढी ।।१।।**

निंदा करणे हे नीच,कडू बोली बोलणे हे कोडी,दगा करणे हे यम,लंपटी राहणे हे ओढीच्या

स्वभावा समान आहे.जगात निच,कोडी,यम,ओढी जसे दु:ख भोगतात तसे हे केवली संतांची निंदा करणारे,केवली संतांशी कड्वी बोली बोलणारे,केवली संतांशी दगा करणारे तसेच स्त्री लंपट यमाचे दु:ख भोगतात. ।।१।।

आण अडे. सो भंगेरियो ।। दुख देसो दाणुं ।।
बाद करे सो बिकार हे ।। फिर बिकळी जाणो ।।२।।

येऊन येऊन अड्णे हे भंगी,दु:ख देणे हे राक्षस,विवाद करणे हे विकली सारखे विकारी स्वभाव आहे.जगात भंगी राक्षस विकली जसे दु:ख भोगतात तसे संताच्या ज्ञानाशी येऊन येऊन अड्तो,संतांना दु:ख देतो,संतांशी विवाद करतो हे यमाचे महादु:ख भोगतात. ।।२।।

ग्यान सुणे बूजे नही ।। सो जड कहावे ।।
जमराय दरबार में ।। सीसे सूर न्हावे ।।३।।

संतांचे ज्ञान ऐकतात परंतु संतांना मोक्षाचा भेद विचारीत नाही ते दगडा सारखे जड आहेत हे सर्व यमराजाच्या दरबारात सीसे सूर न्हावे. ।।३।।

अे अंग लछन नर नार मे ।। नरका चल जावे ।।
जन सुखिया तिहुँ लोक मे ।। कोई भीर न आवे ।।४।।

याप्रमाणे संतांच्या सोबत असे वर्तन करणाऱ्या स्वभावाचे लोक नरकात जाउन पड्तात. आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात अश्या स्वभावाच्या लोकांवर तीन लोक चौदा भवनात कोणालाही दया उपजत नाही. ।।४।।

१२१

।। पदराग जोग धनाश्री ।।

अेका अेकी रे तुं चल जासी
अेका अेकी रे तुं चल जासी ।। अे कोई लार न आसी रे लो ।।टेर।।

अरे प्राणी,तु एका एकी एकटाच चालला जाशील हे कोणीही तुझ्या सोबत येणार नाही. ।।टेर।।

रे मन मुरख चेत संवेरो ।। गाफल कांय ठगावे रे ।।
हेत करे बोले मिठी बाणी ।। अे कोई लार न आवे रे लो ।।१।।

अरे मुर्खा,लवकर हुशार हो.बेसावध होऊन का ठगला जाऊन राहीला आहे.जे जे ही आज तुझ्याशी प्रीती करतात,गोड बोलतात ते कोणीही तु जेव्हा जाशील तेंव्हा तुझ्या सोबत येणार नाही. ।।१।।

अेसी काया तेरी बणी हे ।। आ कोडी के काम न आवे रे ।।
कीड़ी मकोड़ी मरघट जाळे ।। उलटो दु:ख दे जावे रे लो ।।२।।

तुझी काया अशी बनली आहे जी मेल्यानंतर कोणाच्याही उपयोगी येत नाही उलट जेथे तुझ्या शरीराला अग्नी डाग देतात तेथे असंख्य जीव जन्तु जळून भस्म होऊन जातात.

म्हणजे मेल्यावर ही दु:ख देणारी तुझी काया आहे(शरीर आहे)।।२।।

बिना नाव सब झूट सगाई ।। जे ना ना बिध की क्ावे रे ।।
सबही रया बागज देता ।। जम उचक ले जावे रे लो ।।३।।

रामनामा शिवाय दुसरे सर्व पत्नी,पुत्र,भाउ,बहीण इ.हे सर्व सोयरे खोटे आहे.सर्वचे सर्व येथे रड्त राहून जातील व तुला यम झपटून घेउन जाईल. ।।३।।

याहाँ मोहो जिण सूंरे तें नर बांध्यो ।। हेत करे कर माने रे ।।
भीड़ पड़ेगी जाँ दिन तो कूं ।। सब रेगा सुण काने रे लो ।।४।।

तु ज्यांच्या ज्यांच्याशी मोह ठेवला,प्रीती केली आहे ते,ज्या दिवशी तुझ्यावर काळाचे संकट पडेल त्यादिवशी कोणी ही तुझ्या सोबत येणार नाही सर्व दुर होऊन जातील. ।।४।।

रे मन झूटा अे झूटा सारा ।। ओ जुग जम की फासी रे ।।
याँ सूं मोहो करे हर भूले ।। वहाँ तुज कोण छुडासी रे लो ।।५।।

अरे मना,हे सर्व खोटे आहे.हे सारे जग यमाच्या फासीत बांधलेले आहे.यांच्याशी मोह करुन तु हरला विसरुन गेला आहे परंतु जेंव्हा तुला यमाची फासी लागेल तेंव्हा तुला यमापासून कोण सोड्वणार? ।।५।।

याहाँ का सुख दु:ख सब ही सोरा ।। व्हाँ का दुरलभ भाया रे ।।
नरक कुंड मांही ठेलज देसी ।। प्राण सहे बंदे काया रे लो ।।६।।

येथील दु:ख सर्व सोपे आहेत परंतु यमाच्या घराचे दु:ख खुप कठीण आहे.हा यम तुला नरककुंडात टाकेल.तेथे यम तुझ्या शरीरास वेगवेगळ्या प्रकारचे कष्ट देईल.ते सर्व कष्ट तुझ्या जीवास सहन करावे लागतील. ।।६।।

संत पुकारी हेला देवे ।। सुण लीजो नर नारी रे ।।
राम रतन धन त्यागज बेठो ।। आ गेली हे मत्त तमारी रे लो ।।७।।

संत सर्व स्त्री पुरुषांना ओरडून ओरडून सांगत आहेत की तुमची ही रामरतन धन त्यागण्याची बुध्दी वेडी आहे.।।७।।

जुग सूं हेत कियो तें भारी ।। राम नाव नही गावे रे ।।
के सुखराम केहे सब हरजन ।। ओ बांध्यो जमपुर जावे रे लो ।।८।।

तु या कुटूंब परिवाराशी,गोत्राशी खुप भारी प्रीत केली रामनामाशी जराही प्रीत नाही ठेवली.या कारणामुळे तु रामनाम गायले नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात (सांगतात)की,रामनाम रटले नाही(रामनामाचे स्मरण केले नाही)म्हणून तुला यम बांधून आपल्या यमपुरीस घेउन जाईल असे सर्व हरीजन सांगतात. ।।८।।

१३६

।। पदराग धनाश्री ।।

**ग्यान सुणे सुण चेत ज्यो रे**

**ग्यान सुणे सुण चेतज्यो रे ।। सिंवरोनी दीन दयाल ।।**
**तीन लोक इत्त ऊत्त मेरे ।। हरजी करे प्रतपाळ ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतगुरुकडून ज्ञान ऐकून ऐकून हुशार होउन जा व जो रामजी तीन लोकात सर्वाचा प्रतीपाल करतो अश्या दिनदयाळाचे स्मरण करा. ।।टेर।।

**आज काल दिन पांच मेरे ।। सबका चलणा होय ।।**
**भांदू रोवे ओर कूं रे ।। अपना सोच न कोय ।।१।।**

आज किंवा उद्या म्हणजे रीकता,जया,नंदा,भद्रा,पूर्णा या पाच तीर्थी मध्ये म्हणजे सोमवार पासून रविवार पर्यतच्या सात दिवसात जसे सर्व जात आहेत तसे मलाही जावे लागणार ही आपली चिंता करीत नाही व जो गेला त्याचे पुढे काय होईल त्या करीता रडतो.।।१।।

**स्वारथ काजे सोच करे ।। मत सिर बांधो भार ।।**
**इण गेले सब जावसी रे ।। पाप पुन्न की लार ।।२।।**

स्वार्थ म्हणजे विषय विकारांच्या सुखाची चिंता करुन आपल्या शिरावर हरजीच्या गुन्हांचा बोजा बांधु नकोस जसा तो गेला त्या प्रमाणेच सर्व एक दिवस जातात व त्यांच्यासोबत जे पाप व पुण्य कर्म गेले आहे तसेच पाप व पुण्य कर्म सर्वाच्या सोबत चालतात. ।।२।।

**कहाँ कहुँ इण जीव ने रे ।। माने नही रे लगार ।।**
**सोग रोग सुख दुखमे रे ।। गयो जमारो हार ।।३।।**

मी माझ्या मनास काय समजाउ ह्या ज्ञानाची एक गोष्ट समजत नाही.मेलेल्याच्या मागची चिंता,रोग,मायेचे सुख,काळाचे दु:खात हा अनमोल मनुष्य देह हारुन राहीला. ।।३।।

**ग्यान ध्यान हर भक्त की रे ।। केहे जुग कूं जन आण ।।**
**तोई मनवो ना गहे रे ।। आ सुक्रत इम्रत बाण ।।४।।**

हरीचे सतज्ञान,सतध्यान,हरीची भक्ती जगात संत येउन येउन सांगतात तरी ही माझें मन हरीची भक्ती धारण करीत नाही ही संतांची अमृतवाणी सुकृताची खाण आहे.।।४।।

**धाम चल्या क्या रोईये रे ।। जो घर अपणे कूं जाय ।।**

के सुखदेव जिण भेजिया रे ।। जांही लियो हे बुलाय ।।५।।

आपल्या धामास गेला त्याला कश्याला रडायचे तो ज्या घरुन येथे राहायला आला होता त्या घरी पुन्हा गेला.आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात ज्या साईने त्याला पाठविंले होते त्याने परत बोलवून घेतले त्याकरीता का रडायचे.।।५।।

१३९

।। पदराग मंगल ।।

हंसा छाडोनी जुग को नेह

हंसा छाडोनी जुग को नेह ।। जक्त सूं तोडिये ।।
सतगुरां सुँ कर हेत ।। साहेब दिस जोडिये ।।१।।

अरे जीव,जगाचा स्नेह सोड व साहेब मिळवून देणाऱ्या सतगुरुशी प्रेम कर. ।।१।।

बिष प्याला सब छोड ।। अमीरस पीजिये ।।
तन मन दिल को साच ।। साहेब कूँ दीजिये ।।२।।

तू विषय वासनाचे प्याले पिणे सोड व सतवैराग्य ज्ञानरुपी अमृताचे प्याले भरुन भरुन पी सतगुरुच साहेब आहे हा विश्वास कर व आपले तन,मन व निजमन सतगुरु रुपी साहेबाला दे. ।।२।।

मान हमारी बात ।। कहूं समझायबो ।।
ओ मोसर दिन आज ।। बोहर नही पायबो ।।३।।

ही माझी गोष्ट ऐक.मी तुला पुष्कळ तऱ्हेने समजावून सांगत आहे.आज साहेब प्राप्त करण्याची संधी आली आहे.ही संधी हातातून निघून गेल्यानंतर परत मिळणार नाही. ।।३।।

अब के चूक्यो डाव ।। घणो पिसतावसी ।।
लख चौरासी के माय ।। मार बोहों खावसी ।।४।।

हा डाव चुकून गेल्यावर खूप पस्तावा येईल व चौऱ्यांशी लक्ष्य योनीत क्षणा-क्षणाला खूप मार खावा लागेल म्हणून तू मनात समजून रामजीच्या भजनास लाग. ।।४।।

समज समज मन माँय ।। भजन सूं लागीये ।।
काळ भवे सिर तोय ।। नींद सूं जागीये ।।५।।

तुझ्या शिरावर जुलूमी काळ तुला चौऱ्यांशी लक्ष योनीच्या फेऱ्यात टाकण्यासाठी एक सारखा अखंडीत घिरट्या घालत आहे म्हणून तू माया मोहच्या झोपेतून उठून साहेब प्रगट करण्याकरीता जागृत हो.।।५।।

चेते क्यूँ नी गिवार ।। ग्यान सुण जोईये ।।
क्हे सुखदेवजी तोय ।। जलम क्यूं खोईये ।।६।।

अरे मुर्ख जीव तू सतस्वरुप ज्ञान ऐक व जागृत हो तसेच मिळालेला अमुल्य मनुष्य तन गमवू नको असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।६।।

१५४

।। पदराग जोग धनाश्री ।।

## हेला दे दे संत पुकारे

**हेला दे दे संत पुकारे ।। काळ अचानक मारे रे लो ।।टेर।।**

संत जगातील सर्व स्त्री पुरुषांना जोर देउन देउन समजावतात की काळ जसे अचानक येउन सर्वांना मारतो तसे तुला ही अचानक येउन मारेल. ।।टेर।।

**आज निरोगा तन तेरा बणीया ।। नेण गुदी पर आया रे ।।**
**काम पडेग़ा रे तां दिन जम सुं ।। जाँ दिन खबराँ हे भाया रे लो ।।१।।**

आज तुझे शरीर निरोगी आहे.धष्ट पुष्ट आहे.तुझ्यात जवानीचा जोर आहे.तुझे डोळे मानगुटीवर(मानेवरील मागील बाजूने)आले आहे.म्हणजे तुझ्या मनात अती मगरुरी प्रगटली आहे.म्हणून काळ अचानक मारेल ही समझ देणाऱ्या संतांची गोष्ट तु मानत नाही.पुन्हा परंतु ज्या दिवशी तुझे यमाशी काम पडेल तेंव्हा तुझी मदत करणारा कोण राहील.(कोण असेल) ।।१।।

**आज गिणत मे कछू न आणे ।। मन मत वाळो होवे रे ।।**
**ग्यान ध्यान की रत्ति नही माने ।। प्राण करेगा जम जुवारे लो ।।२।।**

आज तु काळापासून सोड्वून देणाऱ्या संतांचे थोडेसे ही मानत नाही व मनाने मदोन्मत मस्तीत डोलतो.तु संताकडून सतज्ञान,ध्यानाची रीत समझने चाहत नाही.परंतु जेव्हा यम तुझा प्राण तुझ्या घटातून वेगळा करेल,तेंव्हा तुझे मदोन्मस्त मन मिटलेले असेल मग त्याच्या भरोश्यावर तु काय करु शकतो.।।२।।

**रे मन चेत अचेतन आंधा ।। तो सिर जम का झोका रे ।।**
**ओ रंग रूप पतंग सो भाई ।। बोहो सहेलो सिर दोखारे लो ।।३।।**

अरे जीव,चेतन(सावध)हो बेसावध(अचेतन)राहू नको आंधळा बनु नकोस.तुझ्या शिरावर यमाची फेरी लागून राहीली आहे.तुझे रुप व रंग पतंगा सारखे आहे.तुझ्या शिरावर अनेक दोष बांधले गेले आहे त्या दोषांचे अनेक दु:ख तुला सहन करावे लागेल. ।।३।।

**काची देहे तेरी जेसी बुद बुदो ।। छिन पलमें फिस जावे रे ।।**
**रे जड़ मूरख क्यूं नर फूले ।। छिन पल लाताँ खावे रे लो ।।४।।**

जसे पाण्याचा बुड्बुडा फुटायला नाजुक राहतो.तसे(तसा तुझा देह आहे)हा तुझा देह एका पळात मिटून जाईल.अरे जड मुर्ख मनात फुलू नकोस.थोड्या क्षणातच तु यमाची

लात खाशील याची समझ ठेव. ।।४।।

चिंते क्यूंई ने होवे क्युंई ।। तोई मुरख नही जाणे रे ।।
अहुंपद लियां रे निस दिन डोले ।। बाद बिबाद ही ठाणे रे लो ।।५।।

तु मनात चिंततो काही व तुझे होते काही तरी ही तु मुर्ख यमाशी काम पडेल हे समजत का नाही?तु अहमपणात रात्रं दिवस झेलून राहीला आहे व काळ सोडवणाऱ्या संताच्या बरोबर वाद–विवाद करुन राहीला आहे.।।५।।

राम धणी कूं कदे हन सिंवरे ।। आन कुं दोड़ मनावे रे ।।
जाँ पल काम पडेग़ा जम सूं ।। तब कहो कूण छुडावे रे लो ।।६।।

राम मालकाचे कधी स्मरण करत नाही व काळाच्या मुखात टाकणाऱ्या राक्षसी देवतांना धावून धावून जाउन मनवतो.जेंव्हा तुझे काळाशी काम पडेल तेंव्हा तुला काळापासून कोण सोडवेल. ।।६।।

बांदेगा जम लायर थांबे ।। नरक कुंड में डारे रे ।।
जम अजरायल बोहो तज बाँका ।। नाय किसी के सारे रे लो ।।७।।

तुला यम नरक कुंडात टाकून अग्नी ने लाल लाल झालेल्या खांबांना बांधेल.अरे हा यम फार अजरायल,बाका आहे.कोणाच्या स्वाधीन होणारा नाही आहे.।।७।।

जम सरीसा बेरी सिरपर ।। गाफल काँय नचीतारे ।।
क्हे सुखराम भज्या बिन सांई ।। जुग जुग व्हेला फजिता रे लो ।।८।।

असा वैरी यम तुझ्या शिरावर आहे मग बेसावध राहायला नको तरी ही तु निश्चिंत कसा राहून राहीला.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,साँई च्या भजना शिवाय युगानुयुग यम तुला मार देउन तुझी फजिती करेल.।।८।।

१५९

।। पदराग जोग धनाश्री ।।

जब जम आण नगर कुं घेरे

जब जम आण नगर कुं घेरे ।। बंध करे बोहो भांती रे ।।
नव दरवाजा आणर रूंधे ।। झांक रहे सब साथी रे लो ।।टेर।।

यम तुझा काया नगरीत तुझा जीवाला घेरुन पुष्कळ तऱ्हेने कैद करेल किंवा शरीराचे सर्व नऊ दरवाजे रोखून त्याचा कैदेतून तुझ्या जीवाला निघू देणार नाही आणि तुझा सर्व सोबती समोर कैद करुन तुला घेऊन जाईल.तेंव्हा तुझे सोबती पाहतच राहतील.परंतु तुझे सोबती यमापासून सोडण्याकरीता काहीही करु शकणार नाही.असे सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।टेर।।

सुण मन समजर चेत सँवेरो ।। हर बिन नही कोई तेरो रे ।।

सरब कबीलो पासे बेठो ।। तुं मत जाणे मेरो रे लो ।।१।।

(अरे संकल्प विकल्प करणाऱ्या)मना,तु ऐकून लवकर हुषार हो.वेळ गमावू नको.अरे हर शिवाय या संसारात कोणीच तुझे नाही.तुझे सर्व कबिल्याचे म्हणजे परीवाराचे लोक तुझ्या जवळ बसलेले आहे.परंतु हे माझे आहे,असे यांना समजु नको. ।।१।।

काहुँ को बळ जोर न लागे ।। बंद्यो जम पुर जावे रे ।।

प्राण बाँध जंवरो ले जावे ।। काया कुं कुटंम्ब जळावे रे लो ।।२।।

हे जवळ बसलेले,बिचारे तरी काय करणार.यांचे कोणाचेही बळ आणि जोर लागणार नाही आणि तु बांधलेला कैद होवून यमपुरीत जाणार.तुला सोडविण्याकरीता यांचा काही जोर लागणार नाही.या तऱ्हेने तुझ्या प्राणास बांधून कैद करुन यम घेऊन जाईल आणि इकडे तुझ्या शरीरास तुझ्या परीवाराचे लोक जाळून टाकतील. ।।२।।

यां काया मांही बोहो दु:ख पाडे. ।। अरथ ना लागण देवे रे ।।

वाँहां सुण जमकी मार सहेला ।। लेखा तिल तिल लेवे रे लो ।।३।।

या तुझ्या शरीराला कोणी जाळेल आणि कोणी गाडेल.या तऱ्हेने तुझे परीवाराचे लोक या शरीराला अनेक तऱ्हेने नाश करतील आणि जीव यमाचा घरी यमाचा मार सहन करत राहील.तेथे यमाच्या घरी एक-एक ,तिळा-तिळाचा हिशोब तुझ्या जवळून घेईल आणि अपराधाबद्दल तुला मार देईन. ।।३।।

के सुखराम समज रे प्राणी ।। वाँ दिन को भै राखो रे ।।

जम अपर बळ काळ सीस पर ।। तां सूं डर हर भाषो रे लो ।।४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,हे समजून त्या दिवसाचा मनात भिती ठेव.अरे हा यम फार अपरबळ आहे.तो आपल्या शिरावर काळ आहे,याला घाबरुन हरनामाचे भजन कर. ।।४।।

१९२

।। पदराग हिन्डोल ।।

कपटी राम न पावे हो

अन्त काल पिस्तावे साधो ।। कपटी राम न पावे हो ।।टेर।।

राम अणि कपटी कोण हे समझू.सतस्वरुप हा राम मन आणि ५ आत्म्याच्या विकारी सुखाकरीता त्रिगुणी मायेशी मोह करतो आणि साहेबाशी बेमुख राहतो तो जीव कपटी. हा जीव कपटी कसा?

आणि सृष्टीत येण्याच्या आधीचा करार गर्भाचा करार-हे परमात्मा,मी तुझीच भक्ती करेल अन्य कोणाची भक्ती करणार नाही.मी मन आणि ५ आत्म्यांच्या विकारांच्या अनुसार बिल्कुल चालणार नाही.मी मन आणि ५ आत्म्यांच्या विकारां करीता त्रिगुणी

मायेची भक्ती कधी ही करणार नाही.त्रिगुणी मायेची भक्ती करुन काळाचा घास कधी ही बनणार नाही. काळ बलवान होईल असे काम,कोध,कुटीलपणाला मारेल आणि ५ आत्म्यांना मुळापासून वेगळे करेल आणि तुझ्यात येवून मिळेल इ. ।।टेर।।

**मुख पर मीठा बहू लघुताई ।। सेणो समजणो बोले हो ।।१।।**

असा कपटी मनुष्य,साहेब म्हणजे सतगुरुच्या तोंडावर ज्ञानाची गोड गोड गोष्टी करतो. आणि साहेब म्हणजे सतगुरुच्या सोबत अती नम्रतेने राहतो आणि मोठ्या मोठ्या ज्ञानाच्या ,शहाणपणाच्या,समझदारी सारखी गोष्ट बोलतो.।।१।।

**दाव घाव सूं ओ ऊर भरीयो ।। साहिब कहो कांहाँ आवे हो ।।२।।**

अश्या कपटी मनुष्याचा उर म्हणजे निजमन त्रिगुणी मायेच्या मन आणि ५ आत्म्यांच्या विकारी सुखांच्या दावपेचाने भरलेले असते.असा त्रिगुणी माया,मन आणि ५ आत्म्यांच्या विकारात भिनलेल्या जीवाचे निजमन साहेब चाहील तर त्याच्या उरात साहेब कसा येईल. ।।२।।

**काम क्रोध कुटलायाँ केती ।। सोचत ही दिन जावे हो ।।३।।**

अश्या कपटी जीवाच्या मनामध्ये काम,कोध तसेच अनेक प्रकारची कुटिलता भरली आहे.त्या विकारी मनाच्या वश होउन जीव या काम,कोध आणि कुटीलपणाचे विचार करण्यात रात्र दिवस व्यतीत करीत आहे आणि साहेब प्राप्त करण्याची चाहना करतो. ।।३।।

**ऊजळ कपड़ा बोहो बिध राखे ।। ज्ञान अरथ सुण ल्यावे हो ।।४।।**

असा कपटी मनुष्य भारी सतज्ञानी दिसेल म्हणजे सतज्ञानाला शोभायमान दिसेल असे अनेक विधीने सफेद(पांढरा)वेश घालून घेतो आणि जग सतज्ञानाने आकर्षित होईल अश्या संतांचे दाखले देऊन देऊन जगाला ज्ञान ऐकवतो.।।४।।

**अंतर मेला नांही भरोसो ।। फिर फिर आन मनावे हो ।।५।।**

असा कपटी मनुष्य साहेबाचे अनेक दाखले जगाला आणून आणून सांगतो परंतु या कपटीचे निजमन वासनिक त्रिगुणी मायेच्या तसेच मन आणि ५ आत्म्यांच्या मळकट वासनांमध्ये लपेटलेला राहतो.म्हणून अश्या कपटी मनुष्याचा साहेबावर भरोसा येत नाही आणि साहेबावर भरोसा न आल्या कारणाने भेरु,क्षेत्रपाल,बिजासन,मुंजोबा, खंडोबा इ.असे पाप कर्ते देवी देवतांना नेहमी नेहमी विकारी सुखांकरीता मनवतो.।।५।।

**फळ कारण ले सेवे प्रभू को ।। प्रममोख कूं चावे हो ।।६।।**

असा कपटी मनुष्य मन आणि ५आत्म्यांच्या विकारी फळाकरीता प्रभुची म्हणजे सतगुरुची सेवा म्हणजे भक्ती करतो.सतगुरुची म्हणजे प्रभुची विकारी फळांकरीता भक्ती करुन सतगुरुंशी परममोक्ष मिळेल अशी चाहणा ठेवतो असा प्रभु सोबत कपट

खेळतो.।।६।।

**क्हे सुखराम राम बिन आसा ।। सो सब कपट कहावे हो ।।७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात सर्व जगाच्या लोकांना सांगून राहीले आहे की, रामजी सोडून विकारी मन व ५ आत्मा,विकारी त्रिगुणी माया तसेच होणकाळ पारब्रम्हाची कोणतीही आशा ठेवतो तो त्या प्राण्याचा साहेबा सोबत कपट आहे.असा कपटी याला राम म्हणजे साहेब कधी प्राप्त होणार नाही.।।७।।

२१६

।। पदराग बिलावल ।।

**मे तुज बूझू रे प्राणीया**

**मे तुज बूझू रे प्राणीया ।। सन मुख कद व्हेलो ।।**

**जिण तो कूं पेदा कीयो ।। तन मन कब देलो ।।टेर।।**

अरे प्राणी ज्याने तुला जन्म दिला त्याच्या सन्मुख केंव्हा होशील?त्याला तुझे तन, मन, केंव्हा देशील?।।टेर।।

**काळा सूं धोळा हुवा ।। सिर डिग मीग धूजे ।।**

**नेणा सूझे धूंधळो ।। तोई भक्त न बूजे ।।१।।**

तुझे काळे केस पांढरे होउन गेले.तूझी मान झामग झामग हालून राहीली आहे.पुसट दिसत आहे.साफ(स्वच्छ)दिसत नाही आहे.तरी ही ज्याने तुला पैदा केले त्याची भक्ती संतांना विचारत नाही. ।।१।।

**सर्वण सब्द न सांभळे ।। इंद्र्या सब थाकी ।।**

**तोई हिडक्यो धनको ।। सिंवरे नहि डाकी ।।२।।**

कानाने ऐकू येत नाही.अश्या प्रकारे सर्व ज्ञानेंद्रिय व कर्मेद्रिय थकून गेले तरीही पिसाळलेल्या कुत्र्यासारखे धनाकरीता पकून राहीला आहे व ज्याने पैदा केले त्याचे स्मरण करत नाही. ।।२।।

**मुख लाळाँ नासा झरे ।। पगसो पड़े नहि ठावा ।।**

**तो बी हर सिंवरे नही ।। हांके नित दावा ।।३।।**

तोंडातून लाळ पड्त आहे,नाकातून पाणी गळत आहे.पाय ठीकाणावर पड्डून नाही राहीला, तरी ही हरीचे स्मरण करत नाही उलट माया प्राप्त करण्याची नेहमी नेहमी गोष्ट करतो. (हाकतो)सांगतो.।।३।।

**जात न्यात घर गांव का ।। कोई बात न माने ।।**

**के सुखदेव तोई जक्क रे ।। करमा दिस ताणे ।।४।।**

जातीचे,नातेवाईक,घरचे,गावचे लोक एक ही तुझी गोष्ट मानत नाही.तरी ही तु काळाच्या मुखात ठेवणाऱ्या कर्माकडेच ताणतो,असा तु मुर्ख आहे असे आदि सतगुरु

सुखरामजी महाराज सांगत आहे.।।४।।

२२१

।। पदराग सोरठ ।।

**मन रे गाफल चेत संवेरो**

**ज्याहाँ चालो त्याहाँ करम न लागे ।। काळ न घाले घेरो ।।टेर।।**

अरे मन,माया मोह व तरुणपणात गाफिल राहू नको,विना विलंब लवकर चेतून जा व अशा जागी चल जेथे कर्म लागत नाही.तुला कर्म लागणार नाही तर दु:ख देण्यासाठी तुझ्या शिरावर काळ घिरट्याही घालणार नाही. ।।टेर।।

**जे लागी तो चेत सभाग्या ।। सोयर क्युँ नर हारे ।।**

**अमर पुरूष मुगत को दाता ।। वाँ कूं काय बिसारे ।।१।।**

जर तुला येथे कर्म नाही लागणार,काळ घिरट्या घालणार नाही अशा देशाची तलब लागलेली आहे तर अरे भाग्यवान जीव हुशार होवून जा आणि अमर होण्याचे भाग्य बनवून घे.३ लोक १४ भवनात ठेवणाऱ्या अन्य भक्त्या माया मोह व तरुणपणाच्या झोपेत झोपू नको.मुश्किलीने मिळालेला हा मनुष्य देह हारु नको.अमर पुरुष जो काळापासून मुक्ती देणारा दाता आहे त्याला थोडेसे ही विसरु नको.त्याचे रात्रदिवस भजन कर. ।।१।।

**जे सूता सो खरा बिगुता ।। जम के हात बिकाया ।।**

**चवदे तीनुं लोक बिचाळे ।। काळ बीण सब खाया ।।२।।**

जो अन्य भक्ती,मोह,ममता व तरुणपणात झोपला आहे.रामभजन नाही करुन राहिला आहे त्याने आपल्या मनुष्य देहाचा बिघाडा केला आहे व तो यमाच्या हाती विकला गेला आहे त्यांना काळ ३ लोक १४ भवनामध्ये शोधून शोधून खातो म्हणून तू तुझे चित्त या जगाच्या अन्य भक्त्यांमध्ये,मोह,ममतामध्ये व देहाच्या तरुणपणात अड्कू नको यांच्यात चित्त टाकल्याने तुला नित्य नित्य काळाचे दु:ख दिले जाईल. ।।२।।

**क्युँ चित खोय रहयो इण जुग में ।। ज्याहाँ दोजख नित दीजे ।।**

**के सुखराम समझ मन मेरा ।। भलो आप को कीजे ।।३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्याच्याने अमरपद मिळत नाही अशा गोष्टीमध्ये हे मन,का चित्त लावून राहिला आहे?अरे मन,तू समझ व अमरलोक प्राप्त करण्याचे आपले भले करुन घे.।।३।।

२२५

।। पदराग कल्याण ।।

**मन रे सिमर सिमर हल सांई**

**राम भजण बिन सांसा जावे ।। सो सब रेत मिलाई ।।टेर।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

अरे मन,अरे जीव,रामनामाच्या स्मरणात आता पर्यंत जे अनमोल श्वास लागले नाही ते सर्व श्वास धुळीस मिळून गेले आहे.पुढे ही जे अनमोल श्वास रामभजनात नाही लागणार ते सर्व श्वास धुळीतच मिळतील.अरे मन,अरे जीव साईने तुला ७७,७६,००००० अनमोल श्वास अमरलोकात पोहचण्याकरीता दिले.हे तुझे अनमोल श्वास रामभजना शिवाय व्यर्थच्या गोष्टींमध्ये लागून राहीले.तु जे जे श्वास रामभजन सोडून अन्य बिन कामाच्या गोष्टींमध्ये लावून राहीला आहे.ती सर्व श्वास धुळीत मिळून राहीले आहे. याकरीता अरे तु मन,तु जीव रामस्मरणाची घाई कर लवकर लवकर कर व साईने दिलेली सर्व श्वास व्यर्थ(वाया)न जाउ देता भजनाला लावून दे.।।टेर।।

**राम भजन की ढील करे रे ।। कर्मा की ताकीदी ।।**
**सत्त संगत तज जाय हतायां ।। फिट लाणत तोय गीदी ।।१।।**

अरे जीव,रामभजनाची ढिलाई करतो व कर्म करण्याची ताकीदी म्हणजे अती घाई करतो,तसेच सतसंग सोडून जेथे व्यर्थ गप्पा होऊन राहील्या आहे त्या बैठकमध्ये धाऊन धाऊन जातो.अरे तुझ्या या निच स्वभावाला धिक्कार आहे.।।१।।

**जुग सूं हेत साध सूं फीको ।। हर तज आन मनावे ।।**
**सतबात की अवग्या कर के ।। बिषे बात मन भावे ।।२।।**

अरे जीव,जगातील लोकांशी प्रिती करतो व साधू से मन फिक्के राहते व हरला सोडून अन्य देवांची भक्ती करतो.सत विज्ञानाच्या गोष्टीची अवसा करतो व विषयांच्या गोष्टी मनाला चांगल्या वाटतात. ।।२।।

**सुय रहे के झोड़ चलावे ।। कांय मुन गहे मन माही ।।**
**के सुखराम ध्रग मन तो ने ।। राम रटे क्यूं नाही ।।३।।**

सतसंगतला गेला तर तेथे झोपून जात होता.जागे राहीला तर संताच्या सोबत निरर्थक गोष्टी करुन झोड करतो व सत चर्चा न करता मनानेच मौन धारण करतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज मनाला सांगतात की,अरे मन,तुला धिक्कार आहे.तु असे अनमोल श्वास का गमावतो.तु प्रत्येक श्वासात रामनाम का नाही रटत. ।।३।।

२२८
।। पदराग बिहगडो ।।

**मन रे मत फूले मुढ गिवांरा**
**तो सिर काळ खाय मूर्डाटी ।। दुस्मण अखत अपारा ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज मनाला सांगत आहे की,अरे मूर्ख मन,अरे गवार मन,तू मदमस्तीने फुलू नको.तुझ्या शिरावर कथले जात नाही तसेच ज्याचा पार येत नाही असा काळ शत्रू तुला कापून कापून खाण्यासाठी विना विश्राम चक्कर कापून राहिला आहे. ।।टेर।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**च्यार दिना की जोर जवानी ।। अंत बुढापो आसी ।।**
**डिग मिग नाड़ नेण नही सूझे ।। लोक करेगा हांसी ।।१।।**

अरे मन,हे तुझे तरुणपण व शरीराची ताकत चार दिवस म्हणजे थोड्या दिवसाची आहे. तुला लवकरच म्हातारपण येईल तेव्हा तरुणपणाचा जोर संपून जाईल.शरीराची ताकत संपून जाईल तेव्हा तुझी मान झामग झामग हालू लागेल तेव्हा लोक तुझी थट्टा करतील. म्हातारपणात तुझ्या डोळ्यांची नजर कमी होईल.राहिल काही आणि दिसेल काही अशी डोळ्यांची स्थिती बनेल तेव्हा आंधळा आला असे म्हणून तुला हसतील. ।।१।।

**यांहाँ अब ही अवरां के सारे ।। छिन पलमे कुमळावे ।।**
**इण बळ कोण धणी बावळा ।। गरभ अंहु क्यूं लावे ।।२।।**

इथे आताच याच प्राप्त देहात तू दुसऱ्यांच्या आश्रीत होवून गेला.तू कोणी काठी पकडल्या शिवाय लघवीला किंवा शौच करायला जावू शकत नाही.शरीराच्या या कमजोर अवस्थेच्या कारणाने क्षणाक्षणात,पळापळात दु:खाने उदास होवून जातो.अरे मन,तू अशा दुबळ्या बळाचा मालक आहे.अरे मन,पागल सारखा गर्व व अहंकार का आणतो आहे? ।।२।।

**पांचू पिसण पचीसूं बेरी ।। तन एक बसे माही ।।**
**तब लग बोलर काय बिगूचे ।। नाव पडी दे:माही ।।३।।**

या पाची इंद्रियाचे विषय शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध तुझे दृष्ट शत्रू आहे आणि या पंचवीस प्रकृती या सर्व तुझ्या वैरी आहेत.हे पाच विषय इंद्रिये व पंचवीस विषय प्रकृत्या असे सर्व तुझ्या घटात उघडपणे निवास करतात तो पर्यंतही तू काय करतो आहेस?जो पर्यंत डोहात(भोवऱ्यात)नाव आहे तो पर्यंत ही नाव केव्हा बुडेल याचा थोडासाही भरवसा राहत नाही अरे मन,तू बोलून काय दाखवितो आहे?।।३।।

**गढपर उलट चडयो नही ऊंचो ।। सायब नाय रिजाया ।।**
**के सुखराम अलप सुख जुग का ।। यामे क्या सुख पाया ।।४।।**

जो पर्यंत तू बंकनाळच्या रस्त्याने उलटून गढावर चढून साहेबाला रिझवत नाही तो पर्यंत तू महासुख प्राप्त करु शकत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज मनाला सांगतात की,या संसाराच्या मोजक्या सुखात काय सुख मिळवून राहिला आहे?या संसाराच्या सुखात सुख तर अल्प आहे व काळाचे दु:ख अगणित आहे हे तू समज व साहेबाला रिझवण्याची विधी धारण कर. ।।४।।

२३१

।। पदराग जोग धनाश्री ।।

**मात पिता सुत बंधू तेरा**

**मात पिता सुत बंधू तेरा ।। सुसरो सासू नारी बे ।।**
**अंतकाळ में अे कौ नही संगी ।। सब स्वारथ की यारी बे ।।टेर।।**

माता,पिता,पुत्र,बंधु,सासरा,सासु,पत्नी जेंव्हा शरीर सुटण्याचा अंत समय येतो व यमदूत घेऊन जुलूम करुन घेऊन जातो.तेंव्हा हे कोणी ही तुझ्या सोबत आपले शरीर त्यागुन तुला एकट्याला जुलूमात न ठेवता त्या जुलूमात साथ देण्याकरीता सोबत चालण्याची जराही तयारी ठेवत नाही.असे स्वार्थ स्वभावाचे आई–वडील,पुत्र,बंधु, सासरे,सासु,पत्नीला सुख मिळत होते तो पर्यंत प्रत्येक क्षणी प्रीती करत होते.जसे ही यमदुताचे तुला दु:ख भोगवणे त्यांना दिसले सर्व तुझ्यापासून दूर होउन गेले व तुझ्या सोबत तुझ्या दु:खात सामिल होण्याची जरुरत विसरुन गेले.।।टेर।।

**सुण मन समझर राम पुकारो ।। सतगुरू सरणो धारी बे ।।**
**अन धन धिणो संपत सारी ।। अेक भक्त बिना भिकीयारी बे ।।१।।**

याकरीता अरे तु मन,तु प्राणी जो या काळाच्या दु:खातून काढून देईल अश्या रामजीची पुकार कर हा रामजी सतगुरुच्या शरणात मिळतो.हा रामजी तुझ्या बोलवण्याने तुझ्या सोबत येईल व प्रत्येक वेळी तुझ्या सोबत राहील व काळाचे केसा इतके ही कष्ट पडू नाही देणार व तुला मोठ्या सुख संपत्तीच्या देशात घेउन जाईल. अरे जीव,तुझ्या जवळ आता अन्न,धन,सुख–संपदा खुप आहे.परंतु हे धन, धान्य, सुख–संपदा,तुझे शरीर सुटताच येथे राहून जाईल.तुझ्या सोबत नाही येउ शकणार हे तु समझ.तुला यम बिना धन,बिना धान्य,बिना सुख संपदा असा भिकारी बनवून तुला भुखेला तहानलेला ठेवून मार देईल.प्रत्येक दु:ख,यातना देईल व आणखी ही दु:ख भोगविण्याकरीता आपल्या यमद्वारात घेउन जाईल.जर तु रामाची भक्ती करुन रामाला प्राप्त करुन घेतले असते तर तुला यम घेउ शकले नसते व तुला यम न घेउन जाता रामजी घेण्यास आले असते व जो आज धान्य, धन,संपदा तुझ्या जवळ आहे त्यापेक्षा अनंत पटीने सुख संपदा रामजी आपल्या देशात तुला बक्षिस मध्ये दिले असते.।।१।।

**खवास पास संग चाकर चेरी ।। हेत करे घर जावे बे ।।**
**काम पडे़गो जब ध्रमराय सें ।। आडो अेक नही आवे बे ।।२।।**

आज तुझ्या सोबत खवास,चाकर,चेरी म्हणजे आज्ञाकारी नोकर चाकर खुप आहेत. तुझ्याशी सर्व खुप प्रीती करतात.हे सर्व तुझा प्रत्येक शब्द तोलून मोलून तुला सुख देण्या करीता तुझी चाकरी(नोकरी)बजावतात.काम वेळेवर पूर्ण झाल्यावर घरी जातात व घरी गेल्यावरही त्यांचे मन त्यांच्या संसारापेक्षा ही जास्त तुझ्यामध्ये रमते परंतु जेंव्हा हे तुझ्याशी प्रीत ठेवणारे नौकर–चाकर एकही धर्मरायच्या आड्वे येत नाही. म्हणजे माझे मालक खुप चांगले आहे आम्हाला त्यांच्याशी खुप प्रीती(प्रेम)आहे.त्यांच्या

शिवाय आम्ही चालतो असे कोणी नाही म्हणत.म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की हे नौकर–चाकर तुझ्यापासून त्यांना जेंव्हा पर्यत धन मिळत होते तो पर्यतच सोबत होते.तुझ्यावर दु:ख पडताच म्हणजे तुझे धन तुझ्यापासून दूर होताच म्हणजे तुझ्या सोबत चालत नाही हे पाहताच या प्रेम करणाऱ्या नौकर–चाकरांनी ही सोबत सोडून दिली.म्हणून तु रामजीची भक्ती कर व साथ देणारा रामजी प्राप्त कर. ।।२।।

**ना कोई तेरो तूं ना काहु को ।। झुटे चित्त नही दिजे बे ।।**
**क्हे सुखराम समझ रे प्राणी ।। हर भज बिलम न किजे बे ।।३।।**

अरे प्राणी, माता, पिता, पुत्र, पुत्री, बंधु, सासु, सासरे,पत्नी,धन,धान्य,सुख संपदा,नौकर चाकर हे कोणी तुझे नाहीत व तु ही यांचा नाही.जर तु यांचा असता तर तु यांना एकटे सोडून गेला नसता.म्हणून तुझे चित्त रामजीमध्ये दे(ठेव).जे तुझेच आहे किंवा तु ज्यांचा नाही आहे अश्या खोटेपणात चित्त लावू नकोस.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,अरे प्राणी हे माता पिता,पुत्र,पुत्री,बंधु,सासु,सासरे,पत्नी,धन, धान्य, सुख संपदा,नौकर चाकर हे तुझे नाहीत.हे ज्ञानाने समझ व जो तुझा आहे अश्या हर ला भजन्यामध्ये जराही विलंब करु नकोस व भजून त्याला घटात प्रगट करुन घे.।।३।।

२४५
।। पदराग केदारा ।।

**नहि रे असो लगन दूजो कोय**
**लख चोरासी ओर सावां ।। ज्याँ मे ब्याव न होय ।।टेर।।**

लग्न करण्याच्या तीथीमध्येंच लग्न होते.लग्न तिथी नाही निघाली तर विवाहही होत नाही.असेच मनुष्य देहाच्या लग्न तिथीमध्ये परमात्म्याच्या सोबत आत्मांरुपी स्त्रीचा विवाह होतो.हा आत्मा स्त्रीचा विवाह चौऱ्यांशी लाख योनीच्या देहात कधी होत नाही. ।।टेर।।

**पारब्रम्ह सो भेजिया हो ।। भेद नीराळो संभाय ।।**
**धिया प्रणो ब्रम्ह सुन्न मे ।। बगत टाळीयो जाय ।।१।।**

सतस्वरुप पारब्रम्ह ने मायेमध्ये अटकण्यापासून वेगळा मोक्षात जाण्याचा भेद देउन मृत्युलोकात मनुष्य देहात पाठविले होते.तो भेद सतज्ञानाने समझून मनुष्य देह प्राप्त केलेल्या आत्म्याने ब्रम्ह शुन्य मध्ये सतस्वरुप परमात्म्या सोबत विवाह करायला हवा.हा मनुष्य देहाचा अवसर संपल्यानंतर चौऱ्याशी लक्ष्य योनीच्या अवसर मध्ये मोक्ष प्राप्त करण्याचे काम होत नाही. ।।१।।

**सतगुरा हेलो पाडियो हो ।। सुण लीज्यो नर नार ।।**

अब के मोसर चूक गयां रे ।। कदे न परण न हार ।।२।।

सतगुरु सतज्ञानाने सर्व स्त्री पुरुषांना जोर देउन देउन समझावून राहीले आहे की जसे लग्न तिथी निघुन गेल्यावर कितीही चाहना केली प्रयत्न केले तरी ही कधी ही लग्न होत नाही.असेच हा मानव तनाचा अवतार चुकून गेल्यावर चौऱ्याशी लाख योनीमध्ये मोक्ष प्राप्त करण्याची किती ही इच्छा केली तरी ही मोक्ष होत नाही. ।।२।।

जुग जुग रेसो कंवारडारे ।। पडसो अगत के माय ।।
ममता तृष्णा अंत सतासी ।। त्रपत हो सो नाय ।।३।।

जसे लग्न मुहुर्त टळून गेल्याने मनुष्याला नेहमी करीता कुंवारे राहावे लागते तरी ही त्यात गृहस्थी सुख मिळत नाही.त्याला गृहस्थी सुखाची चाहना भयंकर सतावित असते.गृहस्थी सुखाच्या अतृप्ती मध्ये मन त्याला सुखाकरीता भटकवित राहते.तरीही विवाह न झाल्यामुळे सुखाच्या अतृप्तीतून जावे लागत असते.विवाह शिवाय शरीराचा अंत होउन जातो.प्राण घटातून निघून जातो व तो प्राण भूताच्या अगती योनीमध्ये जावून सुखा करीता जीवाला भटकवित राहतो.भटकल्यानंतरही तेथून त्याला ते सुख मिळत नाही. अश्याप्रकारे आत्म्याने परमात्म्याशी विवाह केला नाही तर मोक्षाचे तृप्त सुख मिळत नाही.चौऱ्याशी लक्ष्य योनीचे दु:खाच्या अगती योनीमध्ये पडावे लागते. ममता,तृष्णा महासुखा करीता तरसवीत असते व जीव महासुखाचे तृप्त सुख न मिळाल्याने अतृप्तीच्या सोबत चौऱ्याशी योनीच्या दु:खामध्ये फिरत राहतात. ।।३।।

के सुखदेव कोई ब्यावज मांडो ।। चावे सो लो मुज पास ।।
ब्रम्ह लोक मे फेरा पाडू ।। बोहोर न रेहे जुग आस ।।४।।

याकरीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले मी सर्व स्त्री पुरुषांकरीता आत्म्याचे ब्रम्हशुन्य मध्ये सतस्वरुप ब्रम्हा सोबत विवाह करुन देण्याची व्यवस्था मांडली आहे.ज्यांना ज्यांना विवाह करण्याची चाहना आहे ते माझ्या शरणात या.मी ब्रम्हमध्ये सतस्वरुप ब्रम्ह सोबत तुमचे फेरे करुन देईल.मग तुम्ही कधी ८४ योनी मध्ये पडणार नाही. ।।४।।

२७१
।। पदराग सोरठ ।।

पांडे से सब मधम कहावे
तांबा भखे पीवे ले नासा ।। सो सट प्रळे जावे ।। टेर ।।

अरे पंडीत,तम्बाखू खाणे,चिलम पिणे,नाका ने नस(तपकीर)सुंघणे हे सर्व पाप कर्म करणे आहे.अरे मुर्ख,असे कर्म केल्याने जीव नरकात पडतो.।।टेर।।

कंद मुळ ऋषां खिण खाया ।। औरत बी संग कीवी ।।
चोरी फेर करी रिष संता ।। तांबा किणी अन पीवी ।।१।।

मोठ मोठ्या ऋषींनी कंदमुळ खोदून खोदून खाल्ली,स्त्रीयांचा संग केला,चोऱ्या केल्या परंतु तम्बाखु कोणी ही खाल्ली,पिली,सुघंली नाही. ॥१॥

राम किसन जुग राज सो कीया ॥ घर धरणी सुण राखी ॥
बांध क्रोध जीव खल माऱ्या ॥ तांबा किणी यन चाखी ॥२॥

रामकृष्ण अवतारांनी राज्य केले.घरात स्त्रीयां ठेवल्या क्रोधात येउन जीवांचा संहार केला परंतु तम्बाखु कोणीही चाखली नाही. ॥२॥

माटी भकी झूट सो बोल्या ॥ दया हिण भी कुहाया ॥
केहे सुखराम इसा क्रम कीया ॥ पिण तांबा पीवी नही भाया ॥३॥

यांनी मास भक्षण(खाल्ले)केले,खोटे ही बोलले दयाहिन होउन निर्दयता ही केली.असे असे कर्म केले परंतु तम्बाखु कोणीही खाल्ली नाही.प्याले नाही.सुंघली नाही.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ॥३॥

२८५

॥ पदराग धनाश्री ॥

प्राणी क्युँ हर बिसऱ्यो रे

प्राणी क्युँ हर बिसऱ्यो रे ॥ तूं देखेनी ग्यान बिचार ॥
किणी एक सुक्रत पावियो रे ॥ ओ मानव तन अवतार ॥टेर॥

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,अरे प्राणी,ज्या रामजीने तुला मनुष्य अवतार दिला अशा रामजीला तू का भुलला?तू सतज्ञानाने विचार कर की,तुला तुझे कोणते भारी सुकृताचे कारण मनुष्य देह मिळाला आहे.या मनुष्य देहाला ३ लोक १४ भवनाचे ब्रम्हा,विष्णु,महादेव,इंद्र आणि सारखे सर्व देवता मोठे अवतार मानतात.असा मनुष्य अवतार रामजीचा मोठ्या कृपेने तुला मिळाला आहे.॥टेर॥

जिण तोकु पेदा कियो रे ॥ नख चख सकळ बणाय ॥
ग्रभवास मे रछया किवी रे ॥ रिजक पूवायो हे लाय ॥१॥

ज्या रामजीने तुला पैदा केले आहे,त्याला भुलु नको,अरे प्राणी,त्या रामजीने तुला सतस्वरुपी संत दर्शनासाठी डोळे बनवून दिले.सतज्ञान ऐकण्याकरीता कान बनवून दिले.सतगुरु दर्शन आणि सतसंगात जाण्यासाठी पाय बनवून दिले.सतज्ञानाचा समजून विचार करण्यासाठी बुध्दि बनवून दिली.असे असे काळापासून मुक्त करणारे, सतज्ञानाला समजण्या करीता तुझा नखापासून चखापर्यंत अनेक सर्व वस्तु बनवून दिल्या.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हा मनुष्य तन नऊ महिने पर्यंत अति कठीन गर्भाचा विधीने बनतो.या प्रकारे तुझा पण मनुष्य तन घडण्या करीता असे कठीन विधीत ठेवला होता.तेव्हा गर्भवासाचे अनेक प्रकारचे तावाने तुझा मनुष्य तनाला

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

घडण्याचा प्रकियात कच्चा मौते सारखा धोका होवू नये,या करीता तुझी त्या रामजीने गर्भवासात जतन करुन रक्षा केली.पूर्ण मनुष्य तन बनवण्या करीता तुझा तनात ताव सहन केले,ताकद बनून राहीली पाहिजे म्हणून तुला तुझा मनात भावतील असे असे शक्ति वर्धक खाण्या–पिण्याचे पदार्थ पोहोचवले परंतु तू असा निघाला की असे दयालु रामजीला भुलुन गेला आहे.।१।

**सकळ पसारो कारबोरे ।। काचो जुग बूहार ।।**
**तुं माया में रच रहयो रे ।। क्या चलसी तोय लार ।।२।।**

तु हर सोडून खोटे त्रिगुणी मायावी देवी देवता मध्ये आणि कुटुंब परिवार पुत्र,पत्नी, धन,राज इ.मायामध्ये रचून मचून मग्न होवून गेला आहे.हा सारा देवी देवतांचा पसारा जगत आणि कुटुंब परिवाराचा व्यवहार तुला काळापासून सोडण्याकरीता खोटे आहे, कच्चे आहे मजबुत नाही आहे.तुझा अंतिम वेळ आल्यावर हे सर्व देवी देवता आणि कुटुंब परिवार स्त्री,पुत्र,धन इ.मधून एक पण बरोबर नाही चालणार,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज प्रत्येक प्राणीला सांगून राहीले आहे.।।२।।

**आज काल दिन सात मेरे ।। उठ चलेगो जोय ।।**
**चवदा तीनू लोक मेरे ।। तने राख सके नही कोय ।।३।।**

तुला आज किंवा उद्या म्हणजे सोमवार पासून रविवार पर्यंतचे कोणत्याही वारात काळाचा बरोबर उठून जावे लागेल म्हणजे सात वारात वेगळा नवा वार तर उठून जाण्या करीता काही उगणार नाही.जगाचे सर्व ज्ञानी,ध्यानी सांगतात की,प्राण्याला ३ लोक १४ भवनात हर सोडून काळापासून वाचवणारा असा कोणी देवता पराक्रमी नाही आहे आणि तुझा मनुष्य देहाने तू पण हर सोडून अन्य देवतांची ही भक्ति केली आहे. परंतु ते देवता तुला काळाचा दु:खा ने वाचवून कसे ठेवतील?।।३।।

**मिनषा देहे कीं खाटवा रे ।। ज्हाँ तहाँ खपटे खाय ।।**
**के सुखदेव पिस्तावसी रे ।। तूं समज सूळज हर गाय ।।४।।**

अरे प्राणी,हा मनुष्य देह सुटून गेल्यावर काळ तुझे केलेल्या कर्माचा अनुसार महासंकटाचा योनीत टाकत जाईल.तेथे तुला अति दु:ख भोगावे लागेल.दु:ख भोगले नाही गेल्यावर या दु:खातून काढून देणारा आणि महासुखात पोहोचवणारा मनुष्य देहाची आठवण येईल आणि हाताने गमावला,याचा तुला पळा पळात पस्तावा येईल.या करीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज प्राण्याला सांगतात की,तू आजही सतज्ञानाने समज आणि सुळझ आणि या सर्व देवतांच्या भक्त्या आणि कुटुंब परिवाराचा मोह त्याग आणि तुला काळापासून सोडवून सुखात टाकतील.असे हरला गा म्हणजे हरचे भजन कर. ।।४।।

२८८

।। पदराग मारू ।।

**प्राणीयां काय तूं सुतो रे**

**प्राणीयां काय तूं सुतो रे ।। थारो करेनी घर को सूल ।।टेर।।**

अरे प्राणी मोह मायेच्या काळाच्या खोट्या संसारात का झोपला आहे?तु तुझ्या आनंद घराची व्यवस्था कर.।।टेर।।

**आज घडी पल पोर मे रे ।। ओ जुग जासी छाड ।।**

**सेण हे तुं तेरा सगळा रे ।। करसी काडो काड ।।१।।**

तुला पळात(क्षणात)हे जगत सोडावे लागेल.आता घरात जे तुझे हीतैषी आहे ते हीतैषी तुझे हे जग सोडल्याने घरातून लवकर काढा,लवकर काढा असे बोलतील व तसे करतील मग तु कोणत्या घरात राहशील?म्हणून तु वेळ न करता आपल्या आनंद घराची व्यवस्था कर. ।।१।।

**आठ पोर चोसट घड़ी रे ।। काळ भंवे सिर तोय ।।**

**रे मुरख प्राणी मेरी सुण ।। तो कूं सोच न कोय ।।२।।**

हा काळ आठ प्रहर चौसष्ट घडी तुझ्या शिरावर तुला तुझ्या घटातून काढण्याकरीता चक्कर लावून राहीला आहे.अरे मुर्ख प्राणी ऐक,या घटातून काढल्यानंतर तु कोणत्या घरात राहायला जाशील?याची चिंता कर बिना चिंतेचा राहू नकोस. ।।२।।

**हाथ मसळ युंही जावसो रे ।। लार चले कुछ नाय ।।**

**के सुखदेव जी सांभळो रे ।। जनम गमावे काय ।।३।।**

जेंव्हा घर सोड्शील तेंव्हा सोबत घरचा एक ही प्राणी किंवा एक ही वस्तु चालणार नाही,तु एकटाच हाथ मळत जाशील.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की सर्व स्त्री-पुरुष ऐका या नर(मनुष्य)जन्माने आनंद घर मिळू शकते.ते तुम्ही हाथाने का जाउ देतात. ।।३।।

२९०

।। पदराग केदारा ।।

**प्राणीया रे समज सिंमरो राम**

**देख बिचार समज कर दील मे ।। हरि बिन झूठा काम ।।टेर।।**

अरे प्राणी,ह्रदयात सत्तज्ञानाने समझ आणि विचार कर.हरीचा स्मरण विना तू येथून उठून काळाचा देशात जाशील आणि तेथे केलेल्या कर्माचे फार धक्के खाशील.हरीचा स्मरण करण्या विना जेवढे पण तू क्रिया कर्म करतो आहे,ते सर्व काळापासून मुक्त होण्याकरीता खोटे काम आहे.।।टेर।।

**सुत्त बित्त सेंग धऱ्या रहे लारे ।। ऊठ अकेलो जाय ।।**

**कीया करम चलेगा साथे ।। धका बोत बिध खाय ।।१।।**

तुझी पत्नी,पुत्र,धन हे सर्व जागचा जागी धरलेले राहून जातील.यांना सोडून तुला एकट्याला ही जावे लागेल.हे पुत्र,पत्नी,धन हे काही लेशमात्र ही तुझा संगतीने नाही चालू शकणार.उलट पत्नी,पुत्र,धनासाठी केलेले सर्व निच कर्म तुझा सोबत पुढे पुढे चालतील.त्या कर्माचा मुळे काळाचे अनेक धक्के तुला मिळतील.या करीता तू समज आणि काळा पासून मुक्त करणारे रामजीचे स्मरण कर.त्याचा स्मरण शिवाय जे पण कुळ परिवाराचे मोह ममताचा कारणामुळे कर्म करत आहे,ते सर्व खोटे काम आहे. ।।१।।

**कमर बांध्या बेठो हे पंथ में ।। चालो चालो होय ।।**
**काळ सिराणे अेम खड्रो हे ।। ज्यूं संग छाया जोय ।।२।।**

तू कमर बांधून काळाचा द्वारात उठून चालण्या करीता रस्त्यात मधोमध बसला आहे. तुझे जन्मण्याचे दिवस दुर जावून राहीले आहे आणि मरण्याचे म्हणजे काळाचा देशात जाण्याचे दिवस जवळ येऊन राहीले आहे.तुला राम भजन करण्याकरीता भेटलेले श्वास दिंवसेदिवस घटून राहीले आहे.जसे प्रत्येका सोबत सावली राहते.ती कधीही साथ नाही सोडत.तसे तुला घेऊन जाण्या करीता तुझा शिरावर यम उभा आहे.हे समज आणि ह्रदयात विचार कर आणि सावली सारखे शिरावर बसलेल्या काळाला मारण्या करीता रामजीचे स्मरण कर. ।।२।।

**तेरा तो डेरा जंगळ माही ।। ता मे फेर न कोय ।।**
**बिसवा बीस ईकीस चालणा ।। रेणा निमष न होय ।।३।।**

ज्या तऱ्हेने जंगलात हिंस्त्र प्राणी राहतात आणि ते कधीही प्राण्याला मारुन खाऊन टाकतात त्या प्रकारे हा हिंसक काळ तुला कधी ही तुझा मनुष्य देहातून काढुन महादु:खाचे ८४ लाख योनीत टाकेल.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,या करीता तू समज आणि हरीचे स्मरण कर.

जसे कोणी मनुष्य घनदाट जंगलात जातो.त्या घनदाट जंगलात खुंखार प्राण्याने घेरलेला, आपला प्राण वाचवण्या करीता काही साधन नाही राहत.या कारणाने त्याला कधी ना कधी कोणी ना कोणी प्राणी खाऊन जातो.असेच ही मायाचा देश आदिपासून ही काळाचा जंगल आहे.याच्यात थोडासा ही फेर फार समजू नका.हे अमर लोकाचे समान प्राण्याला ठेवणारा देश नाही आहे.काळ केंव्हा ही खाऊन जाईल.मग पळाभरा करीता पण येथे नाही थांबता येत.या करीता तु काळाचा खाण्याचा अगोदर रामजीचे स्मरण कर.रामनाम घेवून काळास मार आणि अमर लोकाला चल.जेथे तुला काळ कधी नाही खाणार. ।।३।।

**ओर न तो कूं कछुहन दीसे ।। ओ जुग जातो जोय ।।**

**के सुखदेव कर हात रीता ।। ऊठ चले सब लोय ।।४।।**

अरे प्राणी,तुला तुझे येथून उठून जाणे थोडेसे पण दिसत नाही.तू सत्तज्ञानाने समज.हे सर्व जगाचे लोक तुझाच डोळ्या समोर एकटे एकटे उठून जावून राहीले आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व प्राण्यांना सांगतात की,हे सर्व प्राणी बिना रामजी भेटल्याने खाली हात उठून एकटे एकटे उठून जावून राहीले आहे आणि काळाचे धक्के खात आहे.हे काळाचे धक्के तुझावर नाही पडले या करीता तू ज्ञानाने विचार करुन समजून रामजीचे स्मरण कर. ।।४।।

३०४

।। पदराग धनु प्रभाति ।।

**सब भ्रम छाड़ दईजे रे**

**सब भ्रम छाड़ दईजे रे ।। न केवळ नाव लहीजे रे ।।टेर।।**

ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ति इ.चे ज्ञान,ध्यान,करण्या सर्व भ्रम आहे.या सर्व भ्रमाला त्यागून दे आणि निकेवल राम ज्याचात रजो,सतो,तमो माया नाही आणि काल नाही आहे त्याचे नाम घ्या.।।टेर।।

**हरि कूं अंतर गावो रे ।। भले सुण जनम न आवो रे ।।१।।**

हरीला अंतरमध्ये(शरीराच्या आत)गा,त्याला प्राप्त कर आणि जन्म मरणापासून रहित हो म्हणजे परत तीन लोकात जन्मास येऊ नको.।।१।।

**हरि कूं समजर गावो रे ।। मती वो जनम गमावो रे ।।२।।**

हरी सुखाचा दाता आहे आणि दुःखाचा हरता आहे हे समज.त्याला तीन लोकाचे सर्व देहात फक्त मनुष्य देहाने हरीला मिळता येते.या करीता हरीला गा आणि त्याला घटात प्राप्त करुन घे आणि आपले आवागमन मिटवून घे म्हणजे आपला मनुष्य जन्म खोटा गमावू नको. ।।२।।

**आयोडो मोसर जावे रे ।। हर कूं काय न गावे रे ।।३।।**

हा भेटलेला अनमोल मनुष्य तनाचा अवसर श्वास श्वास ने कमी होत जावून राहील आहे. तरी पण तू हरीला का नाही गावून राहीला आहे ?।।३।।

**भजन बिना दुख पासी रे ।। भुगते लख चोरासी रे ।।४।।**

हरीचे भजन विना चौरासी लाख योनिचे भारी दुःख भोगावे लागतील.।।४।।

**राम भजन को साजा रे ।। बंचत हे सुर राजा रे ।।५।।**

अरे,हा मनुष्य तन राम भजन करुन चौरासी लाख योनि मिटवण्याचे साधन आहे. तरी ही तू राम भजन नाही करत.या देहाची वंछना ब्रम्हा,विष्णु,महादेव आणि तेतीस करोड देवतांचा राजा इन्द्र करतो.।।५।।

बोरन नर तन पासी रे ।। भगत बिना पिस्तासी रे ।।६।।

हा मनुष्य तन परत सहज नाही मिळणार.चौरासी लाख योनिचे त्रेचाळीस लाख विस हजार साल पर्यंत कठिण दु:ख भोगेल तेंव्हा हा मानव तन परत भेटण्याचे योग येतात आणि हा पण तेंव्हा कुठे मिळेल,जेथे सतगुरु आहे तेथे मिळतो किंवा जेथे विषय वासनाचा रुपात काळ बसला आहे तेथे मिळतो,पूऱ्या वयाचा(उम्र)मिळतो किंवा कच्चा वयाचा मिळतो हे काही माहीत नाही आहे.।।६।।

राम भजन के काजा रे ।। तुं मत्त खोय अकाजारे ।।७।।

सतगुरु मिळाले असा आजचा सारखे एवढे चौरासी लाख योनिचे दु:ख भोगल्या नंतर ही दुसऱ्यांदा मिळणार नाही.या करीता हा अनमोल मनुष्य तनाला हाताने गमावू नका.तू रामजी ची भक्ति कर.रामजीचा भक्ति विना चौरासी लाखाचे प्रत्येक योनित तुला दु:ख मिळाल्यावर प्रत्येक पळात फार पस्तावेल.हा मनुष्य तन रामभजन करण्यासाठी दिलेला आहे.याला ब्रम्हा, विष्णु,महादेव,शक्ति,वेद,शास्त्र,पुराण,भागवत गीता इ.मध्ये गमावू नको आणि फक्त राम भजन कर.।७।

तन धन जोबन माया रे ।। आ बादळ की छाया रे ।।८।।

हे तुझे निरोगी तन,हे तुझे भरपूर धन आणि जवानी ढगाचा सावली सारखी आहे.जसे ढगाची सावली दिसत नाही दिसत तो पर्यंत नष्ट होवून जाते असेच तुझे तन,धन, जवानी जाण्यास वेळ नाही लागणार. ।।८।।

कह सुखदेव नर दे मूंगी रे ।। ओ मूरख जाणे सूंगी रे ।।९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हा मनुष्य तन फार फार महाग आहे परंतु मुर्ख मनुष्य याला तुच्छ,हलका,फालतु,बेकामाचा समजून त्रिगुणी मायात लावून आणि व्यर्थ गमावतात. ।।९।।

३२३

।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

साहेब जी सें डरीये मन रे

साहेब जी सें डरीये मन रे ।। साहेब जी सें डरिये रे ।।

पल मे राव करे भिकियारी ।। जीवत छिन मे मरिये रे ।।टेर।।

अरे मन,अरे जड जीव,तू साहेबजीचे नेहमी भारी भय ठेव.साहेब बलवान आहे.तो कोणालाही पळात राजा बनवू शकतो तर कोणलाही पळात राजाचा रंक बनवू शकतो. तो कोणालाही पळात मारु शकतो तर पळातच मेलेल्यास जिवंत करु शकतो. याच प्रकारे तुला साहेबाने राजा बनविले आणि तुझा देह सर्व सुख घेता येतात व त्याच्याने भक्ती करता येते असा पूर्ण जवान बनविला म्हणजे तू त्याच्याच कृपेने राजा आहे

आणि त्याच्याच कृपेने जिवंत आहे याकरीता तू मनात इंद्रियाच्या बळावर मगरुर न होता साहेबाशी नेहमी घाबरत रहा म्हणजे त्याच्याशी बेमुख न होता त्याची अवकृपा होईल व त्या अवकृपेने तू ही पळातच राजाचा रंक होवू शकतो व पळातच तुझा प्राण देहातून निघू शकतो हे लक्षात ठेव. ।।टेर।।

**मन मगरूर फूल मत भाई ।। अर तामस चित्त नही धरणारे ।।**
**तूं जढ जीव नीर को बुद बुद ।। पग पग प्रळे पडणारे ।।१।।**

अरे माझा भाऊ मन,तन,धन,जवानी या मायेच्या खोट्या बळावर तू मगरुर बनून फुलू नको आणि चित्तात फुलून खोटा तामस आणू नको.अरे मन,अरे जड जीव,जसा पाण्याचा बुड्बुडा फुटण्यास थोडासाही वेळ लागत नाही असाच तुझा देह पाण्याच्या बुड्बुड्यासारखा प्रलयात जाण्यास थोडासाही उशीर लागणार नाही.अरे जड जीव पदोपदी म्हणजे कोणत्याही पळात तुझा देह प्रलयात पडेल अशी तुझ्या देहाची पदोपदी फुटणाऱ्या पाण्याच्या बुड्बुड्यासारखी स्थिती आहे.।।१।।

**धेकर धाक छाड या ममता ।। मे मे जोर न करिये रे ।।**
**क्रणहार स्मर्थ हे न्यारो ।। तो सूं कछु अन सरियेरे ।।२।।**

तू साहेबाशी द्वेष,धाक करणे सोडून दे उलट त्याच्याशी प्रेम कर आणि माझी काया, माझी पत्नी,माझे राज्य,माझे धन,माझा मुलगा,माझी मुलगी या खोट्या मायेशी लागलेली ममता त्यागून दे.जवानी आणि मायेच्या जोरावर फुलून मी केले,मी केले हा खोटा जोर ही करु नको.करणारा समर्थ वेगळा आहे,तो तू नाही आहे तसेच तुझ्या बळाने एकही कार्य पूर्ण होऊ शकत नाही हे समज. ।।२।।

**आसा राख कहो क्या लेसी ।। च्यार दिनाके तांई रे ।।**
**जां के लिये अड़े नर अंधा ।। छोड चले छिन माहिरे ।।३।।**

अरे जीव,तू कूळ परिवार पत्नी,मुलगा,मुलगी,धन,राज्याच्या बळावर सुख मिळतील ही आशा ठेवू नको यांच्याशी आशा ठेवल्यावर सदाकरीता कोणते सुख मिळणार नाही उलट दु:खच पडतील.येथे तुला चार दिवसाकरीता म्हणजे तुझा अंत केव्हा येईल हे तुला समजणार ही नाही अशा कमी वेळेकरीता देह मिळाला आहे.अरे आंधळ्या,तू ज्यांच्या करीता साहेबाशी अडतो आहे त्यांना एका पळातच सोडून जावे लागते.।।३।।

**मत उत्पात उठावो बोळी ।। निरख प्रख पग ध्रणारे ।।**
**के सुखराम झूट सब हलमा ।। ने छे तो कूं मरणा रे ।।४।।**

अरे मन,अरे जीव तू साहेबा पासून दूर जाशील अशी उत्पात म्हणजे कुकृत्य करु नको व प्रत्येक पाय पाहून पाहून म्हणजे फुंकून फुंकून ठेव.अरे मन,अरे जीव,तुझा देह खोटा आहे व तुझ्या देहाशी जुडलेला सर्व प्रपंचही खोटा आहे.तुला ही निश्चितच मरणे

आहे व मेल्यावर तुझ्याशी जुडलेला सर्व प्रपंच ही तुझ्याशी तुटणे आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज मनाला जीवाला सांगतात.।।४।।

३२९

।। पदराग बसन्त ।।

**समझो हो नर समझ नार**

**समझो हो नर समझ नार ।। बिन भगती ध्रक जीवो संसार ।।टेर।।**

अरे स्त्री–पुरुष दोघे ही समझा सतस्वरुपाच्या भक्ती शिवाय या संसारात जे जगायचे आहे ते त्या जगण्याला धिक्कार आहे.।।टेर।।

**भजन बिनाँ नर सरब अेम ।। कीट स्वान पशु पंछी जेम ।।**

**राज पाट सुर लोक कहाय ।। हर नाम बिनाँ सुण जम खाय ।।१।।**

मनुष्य देह मिळाल्या नंतर ही सतस्वरुपाच्या भजना विणा(शिवाय)सर्व स्त्री–पुरुष,किडे, मकोडे,कुत्रा,पशु आणि पक्षी समान आहे.या किडे,मकोडे,कुत्रा,पक्षी यांना सतस्वरुपाची भक्ती करता येत नाही.परंतु स्त्री–पुरुषांना भक्ती करता येते तरी ही करत नाही. म्हणून न भक्ती करणारे सर्व सारखे आहेत.मग ते पशु पक्षी असोत किंवा मनुष्य देह असो सर्व सारखे आहेत.तुच्छ आहे.स्वर्ग लोकात जसे सुख मिळते तसा सुखाचा राजपाट मिळाला आहे.तरी ही हरीनाम न घेतल्या कारणाने अश्या राजा बादशाहाला यम खातो.।।१।।

**सावधान बुध अकल जोर ।। निरख परख कहे सरब ठोर ।।**

**द्रव्य अपार अखूट होय ।। भजन बिनाँ नर चल्यो हे रोय ।।२।।**

हुशार आहे,बुध्दी अक्कल आहे,सर्व काम निरखुन पारखून करतो,द्रव्य(धन)अपार आहे.न संपणारे आहे.परंतु सतस्वरुपाचे भजन नाही आहे.अश्या हुशार धनवानाला अंतसमयी(मृत्युच्या वेळी)जेव्हा यम घेऊन जातो तेव्हा रडत रडत हा जातो.।।२।।

**करत तप बोहो जोग जुग ।। लेत बीज सरब सुभ चुग ।।**

**कसर कोर नहि रखी मॉय ।। पण बिनाँ नाँव नहि मोख जाय ।।३।।**

संसारात कितीही योग साधना,जप करतात,तप करतात व सर्व शुभ शुभ करणियाँ शोधून शोधून करतात व स्वत: मध्ये काम,कोध,लोभ,मोह,मत्सर,अहंकार तसेच विषय विकारांची कोणती कसर कोर(कमी)ठेवत नाही.तरीही नाम नाही जपले म्हणून मोक्षास जात नाही. ।।३।।

**के सुखदेव बिचार बिमेक ।। सब हार चले नर नार देख ।।**

**मिनख जनम अमोलक पाय ।। गुरू के भेद बिनाँ चले गमाय ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की विवेकाने विचार करा की याप्रकारे हे सर्व स्त्री–पुरुष आपला मनुष्य देह हारुन चालले आहे.हे मनुष्य शरीर मिळाल्यावरही

गुरुचा भेद नाही मिळाला,राम सुमिरन नाही केले.तर हे अमोलक(अनमोल)मनुष्य जन्म सर्व स्त्री–पुरुष गमवून चालले आहे.।।४।।

३३२

।। पदराग बिहगडो ।।

**संता भजलो केवळ रामा**

**ररो ममो सत बीज शबद हे ।। ले पहुँचे निज धामा ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जगातील स्त्री–पुरुषांना सांगत आहे की हे स्त्री पुरुष आपण सर्व केवळ रामाचे भजन करा.हे रकार,अकार,मकार म्हणजे राम शब्द सत्त म्हणजे केवल राम प्राप्त करण्याचे मुळ बीज आहे.हे सत्तचे बीज म्हणजे केवळ राम प्रगट झाल्यावर हंस निजधाम म्हणजे महासुखाच्या देशात पोहचतो.।।टेर।।

**जम की झपट बुरी हे भाया ।। सुण ज्यो सब नर नारी ।।**

**राम भजन बिनाँ प्रथन बंचो ।। मार पडेगी भारी ।।१।।**

यमाची झपट फार वाईट आहे.हे सर्व स्त्री–पुरुष ऐका केवळ रामनामाच्या स्मरणा शिवाय त्रिगुणी मायेची कोणतीही किया करणी करु नका.ह्या क्रिया करणी जसे जप, तप,सत,तीर्थ,व्रत,उपवास,एकादशी,राजसुय यज्ञ,सांख्ययोग,पवनयोग,हटयोग ओअमची साधना,खेचरी,भुचरी इत्यादी मुद्रांच्या साधना श्वासा श्वासातील राम राम आराधना (श्वास–उश्वासात नाही)नवविद्या भक्ती इ.सर्व मायेच्या भक्तीने कोणताही हंस (जीव)यमाच्या मारापासून वाचणारा नाही.या सर्वावर यमाची जास्त कठीण मार पडेल. (भारी) ।।१।।

**ले सो स्वाद जमा के वो घर में ।। अे बातां वाँ पासो ।।**

**साँम बिनाँ जिण ज्याँ बिध कीनी ।। तीन लोक मे खासो ।।२।।**

हे अनेक प्रकारचे भारी मार खाण्याचे अनुभव यमाच्या घरी म्हणजे होणकाळात मिळतील. सत्त स्वामीची भक्ती सोडून ज्यांनी ज्यांनी जश्या जश्या गोष्टी म्हणजे कर्म केले तसा तसा यमाचा मार तीन लोकात खाल. ।।२।।

**खबराँ पडसी वाँ दिन भाया ।। सोचो रे जन लोई ।।**

**ब्हाँल पडेग़ा अंतकाळ में ।। सुण लीजो सब कोई ।।३।।**

अरे सर्व भाऊंनो ज्या दिवशी अनगिणत अनेक प्रकारचा मार पडेल त्या दिवशी कसा न सहन होणारा मार आहे हे समझेल.असा कठीण मार पडेल हे ज्ञान समजून सर्व स्त्री पुरुष अंतकाळ येण्याच्या आधी आजच विचार करा.विना केवळ रामाशिवाय अंतकाळी हाल होतील म्हणजे यम खुप वाईट अगती करेल हे तुम्ही सर्व स्त्री पुरुष ऐकून घ्या. ।।३।।

**चेतन व्हो क्हे सुखदेवजी ।। क्युं ओ जनम गमावो ।।**

ओ सुण जनम अमोलख हीरो ।। नेड़ो निकट न पावो ।।४।।

याकरीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री-पुरुषांना सांगतात की तुम्ही सर्व चेतन(जागृत)होऊन जा म्हणजे हुशार होऊन जा.तुम्हा सर्वांना मनुष्य देहाचा जन्म मिळाला आहे,तो जालीम काळापासून सुटका मिळण्यासाठी हा अनमोल हिरा आहे.हा असा अनमोल मनुष्य देह हिरा हाताने का घालवून राहीले आहे?हा हीरा हातातून निघून गेल्यावर लगेचच परत मिळणारा नाही.हा हीरा परत प्राप्त होण्यासाठी ४३,२०,००० वर्षापर्यत ८४००००० योनीत यमाचे म्हणजे निरंजन होणकाळाचे अनेक जुलूम सहन करावे लागतील. ।।४।।

३६०

।। पदराग मिश्रित ।।

संतो काळ सिर भारी हे ।।

ओ सब कूं खाया जाय ।। छाडो करम उपाय ।।टेर।।

संत हो सर्वांच्या शिरावर सर्वांना चुरुन चुरुन खाणारा भारी काळ बसलेला आहे.तो सर्वांना खाऊन राहिला आहे.येथे पर्यंत की तो सर्व कर्माच्या कर्त्यांना म्हणजे ब्रम्हा, विष्णु,महादेवाला खाऊन राहिला आहे.म्हणून ज्या कर्म कर्त्यांनी म्हणजे ब्रम्हा, विष्णु,महादेवाने काळापासुन वाचण्याकरीता कर्म उपाय केले आहे ते कर्म उपाय त्या कर्त्यांच्या कामी येऊन नाही राहिले असे खोटे आहे म्हणून तुम्ही ही संतांनो त्या कर्म उपयांना त्यागा. ।।टेर।।

ब्रम्ह बाग मे मै रमू रे ।। सुन्न सिखर घर जाय ।।

गढ चढ हेला देत हुँ रे ।। बंधि जगत के माय ।।१।।

मी कर्म उपाय त्यागले व सतस्वरुप ब्रम्ह विज्ञान प्राप्त केले.सतस्वरुप ब्रम्ह विज्ञानाच्या पराक्रमाने मी यमाच्या पलीकडे दहाव्याद्वारात निर्भय होऊन ब्रम्ह बागेत मी रमून राहिलो आहे व मी माया व काळाच्या पलीकडे सुन्न शिखरात घर केले आहे म्हणून मी गढ चढून सुन्न शिखराच्या घराहून सर्व जगाच्या स्त्री,पुरुषांना ज्ञान आवाज देऊन राहिलो आहे. ।।१।।

सतगुरू सरणो लीजियो रे ।। ब्रम्ह ग्यान सुण आय ।।

काळ डरे करतार सूं रे ।। ओर सकळ कूं खाय ।।२।।

हा काळ फक्त ब्रम्ह म्हणजे सतस्वरुप कर्ताराशी भितो बाकी सर्व कर्म कर्तारांना चुरुन चुरुन खातो हा ब्रम्ह कर्तार सर्व कर्म उपाय त्यागून सतगुरुच्या शरणात जाऊन ब्रम्हज्ञान धारण केल्यावर घटात प्रगट होतो.।।२।।

ब्रम्हा बिसन महेस कूं रे ।। चाँद सूर कूं ई खाय ।।

पवन पाणी इंद कूं रे ।। धर आकास मिटाय ।।३।।

हा काळ सर्व कर्म कर्तार असे ब्रम्हा,विष्णु,महादेवाला खातो.हा काळ चंद्र,सूर्य,हवा, पाणी ,इंद्र,धरती,आकाश इत्यादीना महाप्रलयात खाऊन मिटवून देतो.।।३।।

पूरण परमानंद को रे ।। सरण गहो तुम आय ।।
काया मे करतार सू रे ।। मिलो रेण दिन ध्याय ।।४।।

म्हणून तुम्ही ब्रम्हा,विष्णु,महादेव इत्यादी कर्मी मायेला त्यागून विलंब न करता पूर्ण परमानंदच्या शरणात व कायेत ज्याला काळ भितो अशा सतस्वरुप कर्तारला रात्रंदिवस भजून मिळा.।।४।।

मानव देह तन पावणो रे ।। सके तो लेखे लाय ।।
सुखदेव हेला देत हें रे ।। पीछे सरेनी काय ।।५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अरे प्राणी हे मानव तन थोड्याच दिवसाचा पाहूणा आहे याला काळ कधी ही खाऊन मिटवून देईल म्हणून या मिळालेल्या मनुष्य तन पाहुण्याला असेच गमवू नका त्याला ब्रम्ह कर्तार प्राप्त करण्या करीता लावा.हा मानव तन पाहूणा हातातून सुटून गेल्यावर तुमचे काळापासून वाचण्याचे काम सरणार नाही हे ज्ञान दृष्टीने समजा. ।।५।।

३८४

।। पदराग जोग धनाश्री ।।

सुण लिज्यों लो सुण लिज्यों लो
सुण लिज्यों लो सुण लिज्यों लो ।। समझर धारा बिचारी रे लो ।।
भगत बिनॉ नर मुगती नाही ।। जाय जनम सो हारी रे लो ।।टेर ।।

अरे लोक,माझे सत्तज्ञान ऐकून घ्या.माझे सत्तज्ञान ऐकून घ्या.मी सांगतो ते समजून धारण करा.हरीच्या भक्तीशिवाय परममुक्ती नाही आहे.याचा विचार करा.भक्तीच्या शिवाय जिंकलेला तुमचा मनुष्य जन्म हारुन राहीला आहे.।।टेर।।

भजन बिना जुग ध्रक जनम है ।। काहा पुरूष काहा नारी रे ।।
धनवंत राव कहां निरधन रे ।। छुछम बुध कहां भारी रे लो ।।१।।

हरीच्या भजना शिवाय स्त्री असो वा पुरुष त्याच्या मनुष्य जन्मास धिक्कार आहे. धनवंत असो वा निरधन,चतूर बुध्दीचा असो वा छोटी बुध्दीचा असो हरीचे भजन केल्या विना सर्वांच्या मनुष्य देहाचा धिक्कार आहे.।।१।।

सुरता बकता मुरख ज्ञानी ।। हर बिन निसदिन गावे रे ।।
निजकण नांव अरध बिन जाण्या ।। सबकूं जंवरो खावे रे लो ।।२।।

श्रोता असो वा वक्ता,मुर्ख असो या ज्ञानी असो हरी शिवाय अन्य देवतांना रात्रंदिवस गातो आहे.त्याच्या मनुष्य देहास धिक्कार आहे.निजकण नामा विना(शिवाय)म्हणजे अर्धा ररंकार शब्द घटात प्रगटल्या विना सर्वांना यम खाऊन टाकतो.।।२।।

हुनर कोट कला बहो सीख्यो ।। नाना बिध का सारा रे ।।
अेके नांव लिया बिन घर ओ ।। बेग्यो काली धारा रे लो ।।३।।

करोडो प्रकारचे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्तीची कला शिकून घेतो.अनेक प्रकारच्या करण्या शिकून घेतो परंतु एक हरीचे नाव घेत नाही.त्यामुळे परममुक्ती मिळत नाही. यमाच्या जुलुमाच्या काळ्या धारेमध्ये वाहून जातो.।।३।।

चेत चेत मन चेत सवेरों ।। समज सोच मन भाई रे ।।
के सुखराम मोख को मोसर ।। अबके चूक न जाई रे लो ।।४।।

अरे मन हुशार हो,लवकर हुशार हो व समजून विचार कर व आता मिळालेली मोक्ष जाण्याची वेळ चुकू देऊ नकोस. ।।४।।

३८५

।। पदराग धनाश्री ।।

सुणज्यो नर सब आय केरे

सुणज्यो नर सब आयके रे ।। दीया म्हे हेला ।।
जनम अमोलक जायहे रे ।। तूं राम कब केला ।।टेर।।

तुमचा अनमोल मनुष्य जन्म बिना राम बोलण्याने व्यर्थ जाऊन राहिला आहे हे मी तुम्हाला हाका मारुन सांगून राहिला हे सर्व लोक ऐका व आता तुम्ही राम केव्हा म्हणाल हे मला सांगा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी,तर नारींना म्हटले. ।।टेर।।

ध्रिग ध्रिग तां को जनम हे रे ।। जा घट भक्त न होय ।।
बिन सिंवरण नर नार हे रे ।। जाय जनम कूं खोय ।।१।।

ज्याच्या घटात रामजीची भक्ती नाही आहे त्यांच्या मनुष्य जन्माला धिक्कार आहे. राम स्मरणाविना हे जगाचे सर्व स्त्री,पुरुष आपला अनमोल मनुष्य देह गमवित जाऊन राहिले आहे. ।।१।।

गुरू सेवा बिन बंदगी रे ।। ओ नर जनम अकाज ।।
क्या ग्यानी क्या मूरखा रे ।। ध्रग सिंवरण बिना राज ।।२।।

ज्ञानी राहो,मूर्ख राहो,राजा राहो किंवा प्रजा राहो सतगुरु समजवितात त्या रामजीची सेवा बंदगी बिना म्हणजे भक्ती विना या सर्वांचा नर जन्म बिन कामाचा जाऊन राहिला आहे म्हणून या सर्वांना धिक्कार आहे, धिक्कार आहे. ।।२।।

सुख संपत धिरकार हे रे ।। जे जन पूजे नाय ।।
तो युंही नर खोय गयो रे ।। ज्युं जळ कूवा माय ।।३।।

जसे विहिरीत पाणी खुप आहे परंतु ते पाणी झाडझुडपांपासुन कोणत्याही प्राणी मात्राच्या पिण्याच्या कामात येत नाही अशा विहिरीला व पाण्याला धिक्कार आहे, धिक्कार आहे

असेच ज्या स्त्री,पुरुषाच्या जवळ धन संपदा,राज संपदा खूप आहे व त्या संपदाचा उपयोग जगाला काळापासुन मुक्त करण्याच्या संत कार्यात नाही आणले आहे किंवा नाही आणत आहे व भोगादिकात लावून दिले किंवा लावून देतात अशा सुख संपदेला व स्त्री पुरुषांच्या मनुष्य देहाला धिक्कार आहे, धिक्कार आहे. ।।३।।

**आतम मे परमात्मा रे ।। तां कूं खोजे नाय ।।**
**सो सो देहे धिक्रार हे रे ।। बंध्या जम पूर जाय ।।४।।**

आत्म्यात परमात्मा आहे त्याला शोधत नाही व त्या परमात्म्यालाव्रत, एकादशी, तिर्थ,जप,तप,सत,यज्ञ,योग,ब्रम्हा,विष्णु,महेशच्या भक्त्यांमध्ये,राक्षसी देवतांच्या भक्त्यां मध्ये जोर लावून लावून शोधतात अशा स्त्री पुरुषांच्या मनुष्य देहाला धिक्कार आहे, धिक्कार आहे. हे सर्व स्त्री पुरुष होणकाळरुपी रामपुरीत गर्भाचे दु:ख,नरकाचे दु:ख, चौऱ्यांशी लक्ष योनीचे,आवागमनाचे दु:ख,आधी,व्याधी,उपाधीचे दु:ख भोगत हाल अपेष्टा सहन करत पड्लेले राहतात. ।।४।।

**पूरण पद के भेद बिना रे ।। जे रत्ता जुग माय ।।**
**सो सो सब ध्रकार हे रे ।। मूळ ठगाणा आय ।।५।।**

पुरण पदाच्या भेदा विना जे जे स्त्री पुरुष होणकाळाच्या भक्त्यांमध्ये रचूनमचून गेले त्या सर्व स्त्री पुरुषाच्या मनुष्य देहाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.त्यांची रामजी पासुन ७७,७६,००,००० श्वासाची प्राप्त केलेली पुंजी होणकाळ ने काळ कपट ने मायेच्या भक्त्यांमध्ये लावून ठगून घेतली आहे.।।५।।

**भक्त बिना सब जक्त हे रे ।। क्या सिध पीर कुवाय ।।**
**ध्रिग ध्रिग सो सुखराम कहे रे ।। हर बिन रत्ता आय ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,रामजीच्या भक्ती विना सर्व जगाचे सिध्द,पीर,ज्ञानी,ध्यानी,स्त्री पुरुषाच्या मनुष्य देहाला धिक्कार आहे, धिक्कार आहे. जे जे ही रामजीच्या विना होणकाळाच्या विध्यांमध्ये रचूनमचून गेले त्यांना धिक्कार आहे,धिक्कार आहे. ।।६।।

३९३
।। पदराग बिहगडो ।।

**सुणो सब यां बातां किम पावे**
**स्मरथ स्याम मुक्त को दाता ।। प्रीत बिना क्यूं आवे ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना सांगतात की,सर्व लोक ऐका. विना प्रीतीने एक मनुष्य सुध्दा दुसऱ्या मनुष्याकडे जात नाही.हे सर्व जगाचे स्त्री पुरुष जाणतात म्हणून या समजने सर्व स्त्री पुरुष मायावी वस्तुंशी खुप प्रीती करतात आणि जो सर्व सृष्टीत समर्थ आहे आणि सर्व सृष्टीचा मुक्तीचा दाता आहे.त्याच्याशी प्रीती

बिलकुल करत नाही तर तो समर्थ साँई तुमच्या घटात तुमच्या प्रीती शिवाय कसा प्रगट होईल?हे ज्ञानाने विचार करा.यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जगाला समर्थ साई सोबत कशी प्रीती नाही हे दाखला देऊन सांगीतले आहे.।।टेर।।

**पईसे ब्याज टके लग काटे ।। ब्याव बीरद के तांई ।।**
**साहेब काज उधारो मिलतां ।। ओ मन लेहेन जाई ।।१।।**

कोणाच्या घरी काही लग्न-विवाह इ.वेळी पैसा घरात नसला तर जास्त व्याज लागले तरी व्याजाने कर्ज घेतो आणि विवाह कार्य संपन्न करतात.परंतु साहेबाच्या कार्या करीता कोणी पैसे उधार बिन व्याजाने देतो किंवा सोबत जेव्हा जमेल तेंव्हा परत कर या समजने देतो तरी ही हे मन रुपये उधार घेण्यास तयार नसते.याचा अर्थ हा होतो की मायावी लग्न-विवाहाशी प्रीती होती म्हणून कसे ही धन घेऊन कार्य करण्याची तयारी झाली आणि समर्थ साहेबाशी प्रीती नव्हती म्हणून धन सहज मिळत होते तरी मनाने घेतले नाही गेले.हे सर्व ज्ञानाने समजा.।।१।।

**ब्याव खर्च न्यात के लेणे ।। सीस अडाणो मारे ।।**
**कर्ता निमत कदे ओ मन मे ।। घर मे थकां न धारे ।।२।।**

घरात लग्न किंवा बारवा,कुटूंब परिवाराशी जुड्लेल्या कार्याचा खर्च असला तरी तो खर्च पूर्ण करण्याकरीता स्वत:चे शिरबंधक रुपये आणतात आणि कार्य करतात.ही बंधक ठेवण्याची पध्दत मारवाड देशात आहे.परंतु कर्ता ज्याने प्रत्येकाला बनविले अश्या कर्त्याच्या कार्याच्या निमित्ताने घरात रुपये असले तरी ही कोणी खर्च करु इच्छीत नाही. यावरुन जगाची मायेशी प्रीती राहीली आणि साहेबाशी अप्रीती राहीली हे स्पष्ट होते हे सर्व ज्ञानाने समजा.।।२।।

**सांई निमत पईसो सिरपे ।। करण करे नही कोई ।।**
**करमा काज जक्त सुण लेणो ।। मिलतां मुडे. न लोई ।।३।।**

त्या स्वामी करीता पैश्याने कर्ज कोणी शिरावर धारण करत नाही परंतु कर्मा करीता संसाराचे लोग कर्ज मिळेल तेथपर्यंत जराही मागे हटत नाही यावरुन स्वामीशी प्रीती नाही आणि संसाराशी खुप प्रीती आहे हे सर्व ज्ञानाने समजा. ।।३।।

**देको तन्नु बीछड़या जुग मे ।। सब रोवे दुख छीजे ।।**
**सिरझण हार मीलण के काजा ।। सपने ई आंख न भीजे ।।४।।**

जो शरीराने म्हणजे तनाचे इष्ट मित्र,पुत्र,पुत्री(मुलगा,मुलगी)पती,पत्नी,आई-वडील आणि जावई पाहूणे इ.परंतु आपली मुलगी सासरी जाते किंवा दुसरे कोणी आपल्या पासून वेगळे होवून कोठे जातात तर धरुन धरुन रड्तो,दु:ख करतो किंवा दु:ख करुन झुरतो की आता आम्ही केव्हा भेटणार.परंतु सिरजनहार साहेबापासून आम्ही अनेक

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

युगापासून वेगळे झालो आहे असा कोणाला विचारही येत नाही.तसेच अश्या सिरजनहाराला भेटण्याकरीता स्वप्नातही डोळ्यातून आश्रू येत नाही.याचाच अर्थ संसारातील प्रत्येक स्त्री पुरुष शरीराशी जुडलेल्या आई वडील,पुत्र,पुत्री,मित्र इ.शी प्रीती आहे परंतु जीवाशी जुडलेल्या परमात्म्याशी प्रीती नाही.मग तो समर्थ साहेब मुक्तीचा दाता जीवाच्या घटात कसा प्रगट होईल?हे सर्व ज्ञानाने बघा. ।।४।।

**खेती किसब करे तन खोई ।। दाम लगावे आणी ।।**

**के सुखराम भक्त की बेळा ।। सब सेल बिध जाणी ।।५।।**

शेती तसेच धंदा हे मेहनतीचे काम आहे.तरी ही शेती तसेच धंदा करण्यात शरीराचा नाश करुन देतात किंवा कर्ज घेऊन पैशेही लावतात परंतु भजनाची विधी कष्टाची सहज सोपी आहे तरी ही भक्ती करण्याची कोणी जराही इच्छा ठेवीत नाही.म्हणजे साईला घटात प्रगट करण्याची जराही प्रीती नाही,मग तो समर्थ साई जो काळापासून मुक्ती करणारा दाता आहे तो तुमच्या घटात कसा प्रगट होईल?असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री पुरुषांना सांगत आहे.।।५।।

३९५

।। पदराग जोग धनाश्री ।।

## ताकू भूलो तू आन धियावे

**ताकू भूलो तू आन धियावे ।। आ मुगत किसी बिध पावे रे लो ।।टेर।।**

तुझ्यावर उपकार करणाऱ्या रामजीला तु विसरुन गेला व ज्यांचे तुझ्यावर काही उपकार नाही अश्या अन्य सर्व ब्रम्हा,विष्णू,महेश,भेरु,भोपा,पीर इं.देवांची धावून धावून आराधना करतो तर तुझी काळापासून मुक्ती कशी होईल?हे सतज्ञानाने समज. ।।टेर।।

**गरभ वास मे रिछया कीनी ।। नख चख तोही बणाया रे ।।**

**देवळ मांड कियो हर असो ।। मांहि रमण हर आया रे लो ।।१।।**

त्याने तुझी गर्भवासात रक्षा केली व तुझे नखापासून डोळ्यापर्यंत सर्व अवयव बनविले व तुझे शरीर रुपी देउळ घडवून तुझ्या सोबत खेळण्याकरीता हर स्वत: तुझ्या घटात आला. ।।१।।

**देवळ की तजबीज ज देखे ।। कैसे घाट हर ल्याया रे ।।**

**तीन लोक फिर सब हम देख्यो ।। असो काहु न बणाया रे लो ।।२।।**

रामजीने बनवविलेल्या देवळाची तजवीज बघ की रामजीने कसे कसे घाट बनवले.तीन लोक फिरुन पाहीले तर असे देउळ तु ज्याला भजतो असा कोणी देव नाही बनवू शकत. ।।२।।

**माँहि झरोखा रे कैसा राख्या ।। न्यारा न्यारा गुण राखे रे लो ।।**

**देखे सुण ले बासा लेवे ।। एक बाणी बोहो भाखे रे लो ।।३।।**

या देवळात झरोखे म्हणजे खिडक्या वेगवेगळ्या बनवून त्यात वेगवेगळे गुण टाकले.तू दोन खिडक्यातून ऐकू शकतो.दोन खिडक्यातून सुगन्ध घेउ शकतो.दोन खिडक्यातून पाहू शकतो.एक खिडकीतून बोलू शकतो,चटपटे स्वादाचे भोजन करु शकतो असे हरने तुझे देउळ बनविले.या हरला तु विसरुन गेला व अन्य देवांनी असे काहीच केले नाही त्यांचे ध्यान करतो.।।३।।

**खाड़ा खपचारे कांटया सूं टाळे ।। जतन करे दिन राती रे ।।**
**तीन लोक में ज्याँ त्याँ फिरसी ।। साहेब रहे तेरे साथी रे लो ।।४।।**

डोळ्याच्या खिडकीने गड्डे,खपचे,काटे दिसतात ज्यामुळे तु तुझा या गड्डे,खपचे व काट्यांपासून काट्यांमुळे होणारे कष्ट टाळू शकतो.असे हर अनेक तऱ्हेने तुझे जतन करतो.तीन लोकात तु कर्मामुळे जेथे तेथे फिरतो तेथे तुझ्या सोबत काळ राहतो त्याच्या पासून वाचविण्याकरीता जेथे तेथे हर तुझा साथी बनून सोबत राहतो.।।४।।

**अे गुण तो सूं साहिब कीया ।। फेर कियाँइ जावेरे ।।**
**तूं जढ भूल रहयो हे साहिब ।। तोई रिजक दिरावे रे लो ।।५।।**

हे सर्व गुण साहेबाने तुझ्यात केले व अजूनही पुढे करुन राहीला आहे व तुला स्वादिष्ट भोजन वेळो वेळी देउन राहीला आहे अश्या साहेबाला तु जड जीव विसरुन गेला व अन्य ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्तीची आराधना करुन रामजी जवळून मुक्तीची आशा करुन राहीला आहे तर रामजी मुक्ती कसे देतील ? ।।५।।

**के सुखराम लाणती रे जीवा ।। पीव छाडर आनजँ वारो रे ।।**
**मिनखा जलम अमोलख हीरो ।। कोंडी साटे मत हारो रे लो ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले अरे जीव,तु मालकाला सोडून अन्य देवतांना पुजतो.अरे जीव,तुला धिक्कार आहे तुझा मनुष्य देह अनमोल हीरा आहे.हा अनमोल हीरा अनंत सुख प्राप्त करण्याकरीता मिळाला होता तो कौडी मोल सुखाकरीता गमवून दिला. ।।६।।